दैनिक
लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२७९ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, बुधवार, २७ मार्च २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

मविआचं ठरलं, महायुतीचं मात्र अडलं! शिंदे-पवार गटाचे उमेदवार ठरेनात

■मुंबई, विशाल कारंडे :

लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीच्या जागावाटपाबाबत गेले अनेक दिवस चर्चा सुरु होत्या. अखेर मविआचा जागावाटपाचा फॉम्युर्ला ठरल्याची माहिती समोर आली आहे. वंचित बहुजन आघाडीशिवाय महाविकास आघाडीचा फॉम्युर्ला ठरल्याचं समोर आलंय. शिवसेना उद्धव ठाकरे गट २२ जागांवर, काँग्रेस १६ जागांवर आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट १० जागांवर लढणार आहे. भिवंडी, सांगली, दक्षिण मध्य आणि जालना यासारख्या तिढा असलेल्या जागांचा प्रश्नसुद्धा सुटल्याची माहिती आहे. भिवंडीची जागा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट, जालन्याची जागा काँग्रेस, सांगलीची आणि दक्षिण मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघ शिवसेना ठाकरे गट लढवणार आहे.

हातकणंगले लोकसभा मतदारसंघासाठी राजू शेट्टी महाविकास आघाडीत सहभागी न झाल्यास शिवसेना ठाकरे गट वेगळा उमेदवार देण्याच्या तयारीत आहे. वंचित बहूजन आघाडीला मविआकडून आणखी एका जागेचा प्रस्ताव देण्यात आलाय. त्यामुळे वंचितच्या प्रस्तावानंतर ठाकरे गट आपले उमेदवार जाहीर करणार आहे. महाविकास आघाडीत ठरलं असलं तरी महायुतीत मात्र तीन जागांवरून तिढा कायम आहे. ठाणे, पालघर आणि रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाच्या जागेवरून वाद आहे. या तीन जागांपैकी भाजपाला एक जागा हवीय. मात्र, एक जागा भाजपला देण्यास शिंदे अनुकूल नाहीत. भाजपाने पालघर किंवा रत्नागिरी-सिंधुदुर्ग यापैकी एक जागा लढवण्याची भूमिका घेतलीय. याबाबत महायुतीच्या नेत्यांनी पुन्हा बैठक घेत तोडगा काढण्याच्या सूचना दिल्लीतून भाजपा पक्ष श्रेष्ठीने दिल्या असल्याची माहिती सूत्रांनी दिलीय. महायुतीचा तिढा तेव्हा तरी सुटेल अशी अपेक्षा आहे.

दरम्यान, जागावाटपाचं ९९% काम पूर्ण झालं असून २८ मार्चला उमेदवारी जाहीर करणार असल्याची माहिती अजित पवार यांनी दिली आहे. शिंदे-फडणवीस यांच्यासोबत यादी जाहीर करणार असल्याचं त्यांनी म्हटलंय. महायुतीत जागा वाटपाचा तिढा कायम असतानाच शिरुरच्या जागेचा प्रश्न जवळपास निकालात निघालाय. शिंदे गटाचे नेते शिवाजीराव आढळराव पाटलांनी शिरूरच्या उमेदवारीसाठी अखेर अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केलाय. उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या उपस्थितीत आढळराव-पाटलांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. त्यामुळे आता आढळराव विरूद्ध कोल्हे असा सामना रंगणार आहे. यावेळी केलेल्या भाषणात आढळरावांनी अमोल कोल्हेंना जोरदार प्रत्युत्तर दिलंय. काही जणं म्हणता मी बेडूक उड्या मारल्यात, पण हा तिनही पक्षांनी मिळून घेतलेला निर्णय आहे. जे आरोप करतात, त्यांनी आपला इतिहास तपासावा असं प्रत्युत्तर आढळराव-पाटील यांनी दिलंय.

CM शिंदेंच्या मुलाला 'विजयी हॅट-ट्रीक'पासून रोखण्यासाठी ठाकरेंचा कल्याणमध्ये आयात उमेदवार

■ठाणे, रोहित जैसवाल

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील कल्याण मतदारसंघामध्ये त्यांच्या खासदारपुत्राविरुद्ध कोणाला निवडणुकीच्या रिंगणात उतरवायचे याबद्दल महाविकास आघाडीत एकमत झालेले नाही. श्रीकांत शिंदेंसारख्या प्रबळ उमेदवाराविरुद्ध नेमकं कोणाला निवडणुकीत उतरवावं यासंदभार्तील चाचपणी सुरु आहे. सध्या तरी स्थानिक पातळीवर ठाकरे गटाबरोबरच महाविकास आघाडीकडे कोणताही आश्वासक चेहरा नसल्याने आयात उमेदवार या मतदारसंघात द्यावा लागणार असं निश्चित मानलं जात आहे. या मतदारसंघातून संभाव्य उमेदवार अगदी उद्धव ठाकरेंच्या नात्यातील वरुण सरदेसाईंपासून ते ठाकरे गटाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांच्या नावाचीही चर्चा झाली. मात्र या दोघांकडून नकार आल्याने आता शिंदेंच्या राजकीय गुरुंच्या घरातील वंशजच शिंदे गटाविरुद्ध मैदानात उतरवण्याचा ठाकरे गटाचा मानस आहे. सध्या ठाकरे गटाकडून ज्या व्यक्तीला उमेदवारी देण्याची चर्चा आहे त्या उमेदवाराचं नाव आहे केदार दिघे! एकनाथ शिंदेंचे राजकीय गुरु आनंद दिघेंचे पुतणे असलेले केदार दिघे हे शिवसेनेत फूट पडल्यापासून ठाण्यामध्ये ठाकरे गटाची बाजू सातत्याने लावून धरत आहेत. एकनाथ शिंदे हे आनंद दिघेंचे शिष्य म्हणून ओळखले जातात. अगदी चित्रपटापासून ते दर कार्यक्रमामध्ये शिंदे आवर्जून आनंद दिघेंचा उल्लेख करतात. त्यामुळेच शिंदेच्या पुत्राची लढत त्यांच्या गुरुंच्या घरातील व्यक्तीबरोबर व्हावी असं उद्धव ठाकरे गटाचं नियोजन असल्याचं समजतं. मात्र असं असलं तरी स्थानिक पातळीवर केदार दिघे हे किती प्रभावी ठरतील याबद्दल उद्धव ठाकरे गटामध्येच मतमतांतरे आहेत. उद्धव ठाकरे गटाकडून शिंदेंच्या बंडानंतर त्यांच्याकडे जो पदभार होता तो म्हणजेच ठाणे जिल्हाप्रमुखपदाचा पदाभार केदार दिघेंकडे सोपवण्यात आला. मात्र या पदावर काम करताना केदार दिघेंना फारशी छाप पाडता आलेली नाही. त्यामुळेच केदार दिघेंना उमेदवारी देण्याबद्दल उद्धव ठाकरे गट उत्सुक असला तरी महाविकास आघाडीमधील मित्रपक्षांची त्याला सहमती मिळण्याची शक्यता फारच कमी असल्याची चर्चा ठाण्याच्या राजकीय वतुर्ळामध्ये आहे.

कल्याण लोकसभा मतदारसंघाचा आवाका फारच मोठा आहे. ठाणे शहराच्या सीमेला लागून असलेल्या कळवा-मुंब्रापासून ते अगदी अंबरनाथपर्यंत हा मतदारसंघ पसरलेला आहे. विधानसभेचे सहा मतदारसंघ या लोकसभा मतदारसंघात येतात. मात्र यामध्येही महायुतीच्या आमदारांचा दबदबा दिसून येतो. कळवा-मुंब्रा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हे शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड आहेत. तर डोंबिवली मतदारसंघ संघाचे आमदार गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय असलेले रविंद्र चव्हाण आहेत. मनसेचे एकमेव आमदार राजू पाटील यांचा कल्याण ग्रामीण मतदारसंघही कल्याण लोकसभा मतदारसंघाचाच भाग आहे. पोलीस स्टेशनमध्ये गोळीबार करणारे भाजपा आमदार गणपत गायकवाड यांचा कल्याण पूर्व मतदारसंघ. कुमार आयलानी आमदार असलेला उल्हासनगर मतदारसंघही कल्याण लोकसभा मतदारसंघातच येतो. कल्याण लोकसभा मतदारसंघ संपतो तिथे म्हणजेच अंबरनाथ विधानसभा मतदारसंघात शिंदे गटाचे बालाजी किणीकर आमदार आहेत. कल्याण लोकसभा मतदारसंघातून २०१४ साली मोदी लाटेत श्रीकांत शिंदे पहिल्यांदा निवडून आले होते. त्यानंतर २०१९ मध्ये पुन्हा श्रीकांत शिंदेंनीच बाजी मारली होती. दोन्ही वेळेस त्यांचे वडील आणि विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी मुलाच्या विजयासाठी मतदारसंघ पिंजून काढला होता.

एमएसआरडीसी कोकण द्रुतगती महामार्ग, सागरी मार्गालगत उभारणार १३ विकास केंद्रे

■मुंबई, नितीन देवळेकर

कोकणातील १०५ गावांतील विकासासाठी राज्य सरकारने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. या निर्णयानुसार पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधूदुर्ग ४४९.८३ चौ किमी क्षेत्रफळात आता एमएसआरडीसीकडून १३ विकास केंद्र (ग्रोथ सेंटर) विकसित केली जाणार आहेत. त्यासाठी एमएसआरडीसीकडून लवकरच विकास आराखडा तयार करण्याचे काम सुरू होणार आहे. मुंबई ते कोकण प्रवास अतिवेगवान व्हावा यासाठी एमएसआरडीसीकडून ३८८ किमी लांबीचा कोकण द्रुतगती महामार्ग आणि ४९८ किमीचा रेवस ते रेडी सागरी किनारा मार्ग (कोस्टल रोड) बांधला जात आहे. या दोन्ही प्रकल्पाच्या आराखडयाचे काम सध्या सुरू आहे. या प्रकल्पालगत विकासाच्या अनेक संधी निर्माण होणार असल्याचे सांगत एमएसआरडीसीने विकास केंद्रे उभारण्याचा प्रस्ताव राज्य सरकारला दिला होता. यात सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर आणि रायगडमधील १०५ गावांमध्ये १३ केंद्रे विकसित करण्याची व त्यासाठी एमएसआरडीसीला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मान्यता देण्याची मागणी करण्यात आली होती. हा प्रस्ताव सरकारने मंजूर केला असून यासंबंधीची अधिसूचना आचारसंहिता लागू होण्याआधी प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे विकास केंद्रांच्या निर्मितीचा मार्ग मोकळा झाला आहे.

कोकणातील चार जिल्ह्यांच्या १५ तालुक्यांतील १०५ गावांचा समावेश असलेले ४४९.८३ चौरस किमी क्षेत्रफळामध्ये ही १३ विकास केंद्रे असतील. महत्त्वाचे म्हणजे सिडकोला नियोजनाचे अधिकार देण्यात आलेल्या १,६३५ गावांमधून ही १०५ गावे वेगळी काढून त्यासाठी एमएसआरडीसीची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक झाली आहे.

संभाव्य विकास केंद : नाव क्षेत्रफळ (चौ. किमी)

* आंबोळगड : ५०.०५
* देवके : २५.४२
* दिघी : २६.९४
* दोडावन : ३८.६७
* केळवा : ४८.२२
* माजगाव : ४७.०७
* मालवण : १५.७५
* नवीन देवगड : ४१.६६
* नवीन गणपतीपुळे : ५९.३८
* न्हावे : २१.९८
* रेडी : १२.०९
* रोहा : २४.८२
* वाधवण : ३३.८८

मेट्रो, रस्ते, विकास प्रकल्पासाठी मुंबईत बेसुमार वृक्षतोड; पुनर्रोपणही ठरलं कुचकामी

■मुंबई, दिगंबर जाधव :

मुंबईची खालावत चाललेली हवेची गुणवत्ता चिंतेची बाब झाली असतानाच आता मुंबईतील हिरवळ झपाट्याने कमी होत असल्याचे समोर आले. माहितीच्या अधिकाराखाली मुंबई महानगरपालिकेकडे मागितलेल्या याबाबतच्या आकडेवारीत धक्कादायक माहिती समोर आली. मागच्या सहा वर्षात विविध विकास प्रकल्पांसाठी मुंबईतील २१,०२८ वृक्ष तोडण्यात आल्याचे या माहितीमधून समोर आले आहे. मेट्रो, बुलेट ट्रेन, कोस्टल रोड, सांडपाणी प्रक्रिया संयंत्र आणि गोरेगाव-मुलुंड लिंक रोड अशा प्रकल्पासाठी सर्वाधिक झाडे तोडण्यात आल्याचे समोर आले आहे. मुंबई मनपाने दिलेल्या माहितीनुसार, २०१८ आणि २०२३ या काळात तब्बल २१,९१६ झाडांचे पुनर्रोपण करण्यात आले. मात्र या झाडांचा जगण्याचा दर फारच कमी आहे. २४ पैकी केवळ नऊ प्रभागांमधील झाडं जगल्याची आकडेवारी प्राप्त झाली आहे. या आकडेवारीनुसार, नऊ प्रभागांमध्ये ४,३३८ झाडांचे पुनर्रोपण केले गेले, त्यापैकी केवळ ९६३ (२२ टक्के) झाडे जगू शकली आहेत. मुंबईकरांसाठी आणखी एक चिंतेची बाब म्हणजे शहरातील वृक्षगणना २९,७५,२८३ असल्याचे मनपाकडून सांगण्यात आले. मात्र अधिकाऱ्यांनी केलेल्या खुलाश्यानुसार ही वृक्षगणना २०११ सालातील आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सांगितले की, झाडे तोडण्याच्या ९० टक्के परवानग्या या पायाभूत सुविधा आणि विकास कामांसाठी दिल्या गेल्या आहेत. मागच्याच आठवड्यात बदली झालेले मुंबई मनपाचे माजी आयुक्त इक्बाल सिंह चहल यांनी सांगितले की, मागच्या सहा वर्षात अनेक विकास प्रकल्पांना गती मिळाली.

वसई-विरारकरांना 'जल' दिलासा; मिळणार मुबलक पाणी

■विरार, सचिन कदम

उन्हाळा सुरू झाल्याने पाणीटंचाई ठिकठिकाणी जाणवत आहे. वसई-विरारकरांना मात्र मुबलक पाणी मिळणार आहे. महापालिका हद्दीत पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये मुबलक पाणीसाठा शिल्लक असल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे. तीन धरणांपैकी एकात वर्षभर पुरेल इतका पाणीसाठा, तर इतर दोन धरणांत दोन ते तीन महिने पुरेल इतका साठा शिल्लक असल्याचे पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून सांगण्यात आले. वसई-विरार शहराला सूर्या, पेल्हार व उसगाव या धरणातून पाणीपुरवठा होतो. त्यामध्ये सूर्या (धामणी) प्रकल्पातून १०० दलल (एमएलडी), सूर्या टप्पा ३ मधून १०० दशलक्ष लिटर आणि एमएमआरडीएमार्फत जानेवारीमध्ये सूर्याचे १६५ दलल अतिरिक्त पाणी दाखल झाले आहे. त्यामुळे सध्या १२० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा शहराला होत आहे. उसगाव धरणातून २० दशलक्ष लिटर आणि पेल्हारमधून १० दशलक्ष लिटर पाणी म्हणजेच एकूण ३५० दलल पाण्याचा पुरवठा सध्या वसई-विरारकरांना केला जात आहे. मागील वर्षी मे महिन्याच्या शेवटी उसगाव आणि पेल्हार या दोन्ही धरणातील अवघे १५ दिवस पुरेल इतकाच जलसाठा होता. तर धामणी धरणात पुरेसा साठा होता. वसई-विरार महापालिका क्षेत्रात धामणी धरणातून सर्वाधिक पाणीपुरवठा केला जातो. त्या खालोखाल उसगाव आणि पेल्हार धरणातून होतो. सद्यस्थितीत हा पाणीसाठा मुबलक असल्याचे धरणाच्या स्थितीवरून दिसून येत आहे.

धामणी धरणात वर्षभराचा साठा

२०२३ मध्ये पावसाळ्यात झालेल्या समाधानकारक पावसामुळे या धरणांपैकी तीनही धरणे १०० टक्के भरून वाहत होती. आता सात महिने उलटले तरी तिन्ही धरणांमध्ये मुबलक पाणीसाठा उपलब्ध आहे. धामणी धरणात ५८.६४ टक्के म्हणजेच २७६.३५ एमएम३ पाणीसाठा शिल्लक आहे. हा वर्षभर पुरेल असे पालिकेने सांगितले. उसगाव आणि पेल्हार धरणात अनुक्रमे ३९.९५ टक्के आणि ५१.७१ टक्के जलसाठा शिल्लक आहे. हा साठा दोन आणि तीन महिने पुरेल इतका आहे.

झोपु योजनेत यापुढे पात्रता मानवी हस्तक्षेपाशिवाय!

■मुंबई,विशाल पाटील

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील झोपडीवासीयांची पात्रता निश्चित करण्यासाठी प्राधिकरणाने विकसित केलेली स्वयंचलित प्रक्रिया आता सर्वच सक्षम यंत्रणांना वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे मानवी हस्तक्षेपाशिवाय पात्रता निश्चित होणार आहे. पूर्वीप्रमाणे सहा ते आठ महिन्यांचा कालावधी न लागता आता काही दिवसांत पात्रता यादी तयार होणार असल्याचे प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश लोखंडे यांनी सांगितले. या प्रक्रियेचा वापर न करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यावर यापुढे कारवाई केली जाणार आहे.

झोपडीवासीयांची पात्रता निश्चित करणासाठी मतदार यादी, विजेचे बिल, आधार कार्ड आदींची आवश्यकता होती. मात्र ही कागदपत्रे काही वेळा बनावट सादर करुन त्याद्वारे पात्रता निश्चित केली जात होती. सक्षम अधिकाऱ्याचा पात्रता निश्चित करण्याचा दरही ठरलेला होता. हा दर दिला तर पात्रता यादीत वाढही होत होती. मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून लोखंडे यांनी साडेतीन वर्षांपूर्वी पदभार स्वीकारल्यापासून पात्रता लवकर व पारदर्शक पद्धतीने निश्चित व्हायला हवी, यासाठी प्रयत्न सुरू केले होते. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून आता एका क्लिकवर झोपडीवासीयाची पात्रता निश्चित होत आहे. यासाठी आवश्यक ती माहिती आता मतदार यादी (निवडणूक आयोग), आधार (युनिक आयडेंटिफिकेश अँथॉरिटी ऑफ इंडिया), वीज बिल (अदानी इलेक्ट्रिसिटी, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ झ्र एमएसईबी, बॉम्बे इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी -बेस्ट) यांनी उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे हा डेटा उपलब्ध असल्यामुळे झोपडीवासीयाची माहिती मानवी हस्तक्षेपाशिवाय तपासणे सोपे झाले आहे, असेही लोखंडे यांनी सांगितले. झोपडीवासीयाला पुनर्वसनातील सदनिका मिळाल्यानंतर त्याला या योजनेत पुन्हा सदनिका घेता येत नाही. पण पुनर्वसनातील सदनिका मिळालेल्या झोपडीवासीयांना पुन्हा पुनर्वसन सदनिका वितरित झाली का, याची तपासणी करणारी कुठलीही यंत्रणा प्राधिकरणाकडे उपलब्ध नव्हती.

डोंबिवलीत कोयता घेऊन तडीपार गुंडाची दहशत, गुन्हे शाखेच्या पथकाकडून गुंड अटकेत



■ठाणे, प्रतिनिधी :

ठाणे जिल्ह्यातून अठरा महिन्यासाठी हद्दपार केलेल्या एका तडीपार गुंडाने सोमवारी रात्री डोंबिवली पूर्वेतील इंदिरानगर भागात हातात कोयता घेऊन दहशत माजविली. पादचाऱ्यांना कोयत्याचा धाक दाखवून घाबरून सोडले. ही माहिती कल्याण गुन्हे शाखेच्या पथकाला मिळताच पोलिसांनी थरार नाट्याप्रमाणे या गुंडाचा पाठलाग करून त्याला अटक केली. गणेश उर्फ गटल्या बाळू आहिरे (२२) असे तडीपार गुंडाचे नाव आहे. तो इंदिरानगर भागात राहतो. एक तडीपार गुंड डोंबिवलीत येऊन इंदिरानगर भागात हातात कोयता घेऊन दहशत माजवित आहे, अशी माहिती कल्याण गुन्हे शाखेचे हवालदार दत्ताराम भोसले यांना मिळाली. त्यांनी ही माहिती तातडीने गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नरेश पवार यांना दिली. पवार यांनी साहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, हवालदार दत्ताराम भोसले, बालाजी शिंदे, गुरूनाथ जरग, विश्वास माने, दीपक महाजन यांचे पथक घटनास्थळी रवाना केले. पोलिसांचे वाहन येत आहे पाहून गणेश इंदिरानगर झोपडपट्टीच्या आतील भागात पळू लागला. पोलीस पथकाने पाठलाग करून इंदिरानगर मधील डॉ. आंबेडकर पुतळ्याच्या मागे गुंड गणेशला अटक केली. गणेशला अटक करताना त्याने कोयत्याच्या साहाय्याने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला पण आक्रमक असलेल्या पथकाने गणेशची गठडी वळली. गणेश हा पोलीस अभिलेखावरील खतरनाक गुंड आहे. त्याच्यावर दहशत माजविणे, शस्त्राचा दाखविणे असे चार गुन्हे पोलीस ठाण्यांमध्ये दाखल आहेत.

कल्याणमधील २६ विकासकांच्या ११४ कोटींची मालमत्ता जप्त

■ठाणे, भावना जैन :

कल्याण डोंबिवली पालिकेची मालमत्ता कर आणि मुक्त जमीन कराची ११४ कोटी १० लाख ३४ हजार ७२९ रुपयांची थकित रक्कम विहित वेळेत भरणा न करणाऱ्या कल्याणमधील २६ विकासक, जमीन मालकांची मालमत्ता जप्त करण्याचा निर्णय पालिकेच्या कर विभागाने घेतला आहे. या मालमत्तांच्या लिलावातून मिळणाऱ्या रकमेतून थकित रक्कम वसूल केली जाणार आहे. २६ मालमत्तांचा लिलाव केल्यानंतर पालिका प्रशासनाला ४९८ कोटी ९६ लाख १० हजार ६५४ रुपये आधारभूत किंमत मिळणार आहे. या रकमेतून थकबाकीदारांची कराची रक्कम वसूल करून प्रशासन उर्वरित रक्कम संबंधित थकबाकीदारांच्या स्वाधीन करण्याची प्रक्रिया पार पाडणार आहे.

२६ थकबाकीदारांकडे पालिकेची अनेक वर्षांची मालमत्ता कर आणि मुक्त जमीन कराची थकबाकी आहे. पालिकेने अनेक वेळा या थकबाकीदारांना कर भरण्यासाठी नोटिसा दिल्या. त्याची दखल थकबाकीदारांनी घेतली नाही. थकबाकीदारांसाठी अभय योजना लागू केल्या. त्याचाही लाभ थकबाकीदारांनी घेतला नाही. थकबाकीदार निर्ढावलेले असल्याने पालिकेने त्यांच्या मालमत्ता जप्त करून त्यांचा लिलाव जाहीर केला आहे. ८ एप्रिल रोजी कल्याणमधील आचार्य अत्रे रंगमंदिरात जप्त २६ मालमत्तांचा लिलाव होणार आहे. जप्त मालमत्तांचे एकूण क्षेत्रफळ ८८ हजार ८७६ चौरस मीटर आहे.

धुळवडीत मोठ्या आवाजात गाणी वाजविल्याने एकावर कुऱ्हाडीने हल्ला

■ठाणे, प्रतिनिधी :

भिवंडी येथील खोणीगाव भागात धुळवड साजरी करण्यासाठी मोठ्या आवाजात गाणी वाजविल्याने एका तरूणावर कुऱ्हाडीने हल्ला करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी निजामपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खोणीगाव येथील मांगतपाडा परिसरात जखमी राहुल गौतम हा त्याच्या मित्रांसोबत राहातो. तो परिसरातील एका यंत्रमाग कारखान्यात कामाला आहे. सोमवारी धुळवड असल्याने राहुल याने त्याच्या मित्रांसोबत धुळवड साजरी करण्यासाठी ध्वनीक्षेपक लावला होता. राहुल हा त्याच्या दोन मित्रांसोबत सोमवारी सायंकाळी धुळवड साजरी करत असताना या परिसरात राहणारा रामु गिरी हा त्याठिकाणी आला. त्याने ध्वनीक्षेपक बंद करण्यास सांगितले. त्यावर राहुल गौतम याने आमचा होळी सण असल्याने आम्ही नाचणार, गाणार असे त्याला सांगितले. त्यानंतर रामुने त्यांना शिवीगाळ केली आणि तो तेथून निघून गेला. अर्ध्या तासाने पुन्हा रामु त्याठिकाणी आला.

ठाण्यात सायकल राईडमधून दिला मतदानाचा संदेश

■ठाणे, यश सावंत

ठाणे महानगरपालिका आणि आम्ही सायकल प्रेमी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करून आपला हक्क बजावावा हा संदेश देण्यासाठी सायकल राईडचे आयोजन करण्यात आले होते या राईडमध्ये १६० सायकलप्रेमींनी सहभाग घेतला. सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेतर्फे मतदारांमध्ये जागृतीसाठी अभियान सुरू आहे. या अभियानातंर्गत ठाणे महापालिका क्षेत्रात मतदार नोंदणी, मतदान याच्याबद्दल जागरुकता निर्माण केली जात आहे. याच अभियानाचा एक भाग म्हणून दोन टप्प्यात ही सायकल राईड संपन्न झाली. नितीन जंक्शन ते निर्बंध रोड आणि ठाणे पूर्व पवई ते मीठ बंदर रोड असे या राईडचे मार्ग होते. "एकेका मताने बनते पडते सरकार" म्हणून तुमचे मत करू नका बेकार", संपूर्ण जगात आहे भारतीय लोकशाहीचे नाव, मतदान करून जागृतपणे दाखवा त्याची शान", "मतदान का हक हे हर नागरिक का हक,जो इसे बजायेगा सच्चा नागरिक कहलायेगा", "मतदान करा, परिवर्तन घडवा", "युवर व्होट इज युअर व्हॉइस"अशा संदेशासह या वेळेला सायकल प्रेमींनी राईड मध्ये सहभाग घेतला. कोपरी येथील मीठबंदर रोड अंफिथिएटर येथे या सायकल राईडची सांगता झाली. विश्वविक्रमी सायकलपटू सतीश जाधव यांनी मतदानाची माहिती दिली. लोकल राईडचे नेतृत्व संकेत सोमणे, चंद्रशेखर जगताप, अजय भोसले, गुरुप्रसाद देसाई, विनोद फर्डे, पंकज कुंभार यांनी तर लॉंग राईडचे नेतृत्व पंकज रिजवानी, अमोल कुलकर्णी, योगेश नाखवा, महेश राऊत,महेश सोमवंशी आणि आदेश जाधव यांनी केले.

//सुविचार

'प्रामाणिकपणा ही फार महाग गोष्ट आहे...
कुठल्याही फालतू माणसाकडून ती मिळण्याची अपेक्षा करू नका.'

भरलेली सिमला मिरची

साहित्य – २ वाट्या मक्याचे दाणे, १/२ चमचा जिरे पूड, पाव चमचा ओवा, १ चमचा लसूण-हिरवी मिरची पेस्ट, २ लहान चमचे दही, फोडणीसाठी तेल, जिरे, मोहरी, तिखट, मीठ, हळद, हिंग, ५-६ लहान आकाराची सिमला मिरची.

कृती : सर्वप्रथम मिरची भरलेल्या वांग्याप्रमाणे मधोमध कापून घ्या. बिया काढून घ्या. एका भांड्यात मक्याचे दाणे व मसाल्याचे सर्व साहित्य एकत्र करून तेलाचे मोहन घाला. मिरचीच्या बिया त्यातच घाला. थोडे दही घालून मिश्रण ओलसर करून घ्या. कढईत तेल, जिरे व मोहरी व हिंग घालून फोडणी करा व तेलावर मिरच्या पसरवा. मंद आचेवर मिरच्या लालसर होऊ द्या. बाजू उलटून घ्या. सर्व बाजूंनी मिरची लाल झाल्यावर गॅस बंद

वयाच्या पन्नाशीतही दिसा यंग आणि फिट

वयाला हरवणाऱ्या काही सोप्या उपायांमुळे आपण ५० वर्षांनंतरही फिट, यंग आणि निरोगी राहू शकता. वय वाढत असल्यामुळे काही त्रास उद्‌भवणे साहजिक आहे. काही पर्याय निवडून आपण आपला त्रास कमी करू शकता. जसे शॉपिंगसाठी इकडे-तिकडे भटकण्यापेक्षा ऑनलाइन शॉपिंग करा. या वयात सुंदर दिसण्याची आवडही कमी होत जाते, म्हणून अनेक महिला अजागळासारख्या राहतात. परंतु, हा लेख केवळ त्या महिलांसाठी आहे ज्या पन्नाशीतही तिशीत असल्यासारख्या दिसू इच्छितात. हे काही सोपे उपाय अमलात आणून आपण या वयातही फिट आणि यंग दिसू शकता.

▮खाद्यपदार्थांनी पोषण मिळवा, सप्लिमेंट्सने नव्हे : ऑर्गेनिक फूड सेवन करा आणि प्रोसेस्ड फूड जसे ब्रेड, पास्ता आणि चीज खाणे टाळा.

▮सूप : भूक भागण्यासाठी सूप प्या. या वयात नियमित भाज्यांचे सूप तयार करून पिणे सर्वोत्तम आहे.

▮रात्री हलके जेवा : रात्री जेवण्याची मात्रा कमी ठेवा. रात्री जेवल्याबरोबर झोपणे टाळा. रात्री कोणत्याही प्रकाराचे स्नॅक्स घेणे टाळा.

▮त्वचेला उपयुक्त आहार घ्या : आपण जे काही खातो, त्याचा प्रभाव आपल्या शरीरावर होतो. म्हणून पोषक तत्त्वे आपल्याला निरोगी ठेवण्यात व सुंदरता वाढवण्यात मदत करतात.

▮प्रदूषणापासून दूर राहा : स्वतः प्रदूषणमुक्त राहण्याचा प्रयत्न करा. घरातून बाहेर निघताना नाक मास्कने झाकून घ्या. सकाळी शुद्ध हवेत फिरा.

▮पायी फिरा : दररोज अर्धा तास तरी पायी फिरा आणि सक्रिय राहा. एकाच जागी बसलात तर आपले पन्नाशीत फिट राहण्याचं स्वप्न पूर्ण होऊ शकत

झोप येत नसेल, तर हे करून बघा

योग आणि योगासनात बरीच क्षमता आहे. योग करा म्हणजे आजार होणार नाही. आजार गंभीर नसला तरीही योग प्रभावी असू शकतो. आज आम्ही इथे सांगणार आहोत की, रात्री झोप येत नसल्यास केले जाणारे फक्त दोन उपाय; ज्यामुळे आपल्याला शांत झोप येईल.

झोप न येण्याची कारणं

तसे तर झोप न येण्याची अनेक कारणे असू शकतात पण दोन कारणं प्रामुख्यानं असू शकतात जसे की शरीराला थकवा न जाणवणं आणि काळजी किंवा सतत दिवसं रात्र विचार करणं. हीच दोन प्रमुख कारणे आहेत म्हणून त्यासाठी येथे दोन उपाय सांगत आहोत.

प्राणायाम

दररोज झोपण्यापूर्वी किमान ५ ते १० मिनिटे प्राणायाम करावा. आपण योगनिद्रेचा सरावदेखील करू शकता. यासाठी शवासनात झोपून शरीर, मन आणि मेंदूला सैल सोडा. डोक्यापासून पायापर्यंत आपल्या संपूर्ण शरीराला सैल सोडा. पूर्ण श्वास घेऊन सोडायचा आहे. आता असा विचार करा की, आपले हात, पाय, पोट, मान, डोळे सर्व काही सैल झाले आहेत. आता स्वतःला सांगा की, मी योगनिद्रेचा सराव करत आहे.

आता आपल्या मनाला शरीराच्या वेगवेगळ्या भागांकडे हलवा आणि त्यांना सैल आणि तणावरहित असण्याची सूचना द्या. आपल्या मनाला उजव्या पायाच्या अंगठ्यावर घेऊन जा. पायाची सर्व बोटे किमान तळपाय, टाच, पोटऱ्या, गुडघा, मांडी, नितंब, कंबर, खांदा सैलसर होत आहे. अशा प्रकारे डावा पाय देखील सैल सोडा. श्वास घ्या आणि सोडा.

आता झोपल्या झोपल्या ५ वेळा पूर्ण श्वास घ्या आणि सोडा. पोट आणि छाती वर-खाली होणार. पोट वर-खाली होणार. हा सराव दररोज करावा. यामुळे मन थकून झोपून जाणार आणि कोणत्याही प्रकारचा विचार करणार नाही.

सूचना

- ▮दक्षिण दिशेला पाय करून झोपू नका.
- ▮तामसी जेवण करू नका. रात्री हलकेच जेवण करावं.
- ▮दिवसात किंवा दुपारी झोपण्याची सवय सोडून द्या.
- ▮कोणत्याही प्रकारची नशा करू नका.
- ▮झोपण्यापूर्वी आपली काळजी आणि विचारांना लांब ठेवून झोपा, कारण जेवढे महत्त्वाचे अन्न, पाणी आणि श्वास घेणे आहे, त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे झोप घेणे.
- ▮रात्री उशिरापर्यंत जागणे आणि सकाळी उशिरा उठणे सोडा.
- ▮झोपेची वेळ टाळल्याने झोप कमी होते.
- ▮झोप बऱ्याच रोगांना स्वतःच ठीक करण्यास सक्षम असते.
- ▮झोपेच्या अभावामुळे डोळ्याभोवती गडद वर्तुळे बनतात, तसेच डोळ्याभोवती काळपटपणा येतो.
- ▮कमी झोपल्याने मेंदू थकलेला जाणवतो आणि वजनदेखील वाढते.

सूर्यनमस्कार

शरीराला थकवण्यासाठी झोपण्यापूर्वी १ तास व्यायाम करा किंवा फक्त १५ मिनिटांसाठी सूर्यनमस्कार करा. सूर्यनमस्कार १२ असतात. या सर्व १२ सूर्यनमस्काराची पुनरावृत्ती किमान १२ वेळा करा.

फोन चार्ज करण्याचा '४०-८०' नियम माहीत आहे का? कधीच खराब होणार नाही बॅटरी

फोन चार्ज करण्यासाठी एक नियम नक्कीच फॉलो केला पाहिजे, जो '४०-८० चार्जिंग रुल' नावाने ओळखला जातो. या नियमानुसार, फोन ४० टक्क्यांपेक्षा कमी चार्ज होईस्तोवर वाट पाहू नये आणि ८० टक्क्यांपेक्षा जास्त चार्ज देखील करू नये.

सध्या आपण मोबाईल फोनवर खूप जास्त अवलंबून आहोत. आपण याचा वापर काम, मनोरंजन आणि मित्र-कुटुंबाच्या संपर्कात राहण्यासाठी करतो. त्यामुळे फोनची बॅटरी जास्त काळ टिकावी याची काळजी आपण घेतली पाहिजे. एक चांगली पद्धत आहे जी '४०-८० चार्जिंग रुल' नावाने ओळखली जाते. या नियमानुसार, आपण आपला फोन ४० टक्क्यांपेक्षा कमी चार्जिंगवर ठेवू नये आणि ८० टक्क्यांपेक्षा जास्त देखील चार्ज करू नये.

तज्ज्ञांच्या मते, ४०-८० चार्जिंग रुल, ही बॅटरी दीर्घकाळ टिकवण्याची एक चांगली पद्धत आहे. हा नियम असा आहे की फोनची बॅटरी कधीही ४० टक्क्यांच्या खाली उतरू देऊ नये तसेच चार्जिंग करताना कधी फोन फुल चार्ज करू नये तर चार्जिंग ८० टक्क्यांवर ठेवावी.

डिस्चार्ज-चार्ज सायकल

लिथियम-आयन बॅटरी जी हल्लीच्या बहुतांश फोन्समध्ये वापरली जाते, या बॅटरीच्या 'डिस्चार्ज-चार्ज सायकल'ची संख्या ठरलेली असते. जेव्हा आपण आपला फोन शून्य टक्क्यांपासून १०० टक्क्यांपर्यंत चार्ज करतो, तेव्हा फोन बॅटरीचा एक डिस्चार्ज-चार्ज सायकल पूर्ण होते. जितके जास्त डिस्चार्ज-चार्ज सायकल आपण आपल्या फोनच्या बॅटरीचे पूर्ण करतो, तेवढ्या लवकरच ती खराब होते. त्यामुळे ४०-८० चार्जिंग रुलचा वापर करून, आपण आपल्या फोनची बॅटरी लाइफ वाढवू शकतो.

ॲपलने दिले वेगळे उत्तर

ॲपल डिस्कशन प्लॅटफॉर्मवर बॅटरी हेल्थबद्दल अनेक प्रश्न विचारण्यात आले होते. ॲपलने या प्रश्नाचे उत्तर देताना फोन ८० टक्क्यांपर्यंत चार्ज ठेवावा, असा सल्ला दिला आहे. त्यामुळे बॅटरी हेल्थ चांगली राहते. ॲपलनुसार, वारंवार चार्ज केल्यावर तिची लाइफ वेगाने ढासळू लागते. तसेच फोन २० टक्क्यांपेक्षा खाली चार्ज गेल्यावरच चार्ज केला पाहिजे. विशेष म्हणजे नव्या आयफोनमध्ये कंपनीने एक नवीन फीचर लॉंच केले आहे, ज्याचे नाव ऑप्टिमाइज चार्जिंग मोड, ज्यात आयफोन ८० टक्के चार्ज झाल्यावर फोन पॉवर घेणे बंद करतो. त्यामुळे आयफोनची बॅटरी हेल्थ चांगली राहते.

कापलेला कांदा लगेच वापरा, फ्रीजमध्ये ठेवणे धोकादायक

रोजची घाई नको म्हणून सॅलड करताना किंवा भाजीची तयारी करताना कांदा आधीपासून कापून ठेवण्याची सवय आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. खूप आधीपासून कापून ठेवलेला कांदा खाणे अत्यंत नुकसान करणारे ठरू शकते. तसेच कांदा कापून फ्रीजमध्ये कधीच ठेवू नये.

कारण कांद्यामध्ये आरोग्यासाठी फायदेशीर असे अनेक औषधी गुण, ॲण्टीबॅक्टेरियल, ॲण्टी इन्फ्लमेटरी घटक असतात. पण फ्रीजमध्ये कापलेला कांदा ठेवल्याने त्यामधील घटक नष्ट होतात.

आपण सोयीसाठी कांदा सोलून जरी फ्रीजमध्ये ठेवत असाल तरी ते नुकसानकारक आहे. सोललेला कांदा आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतो, कारण कांद्याची साले काढल्यानंतर त्याला बॅक्टेरियाचा संसर्ग होण्याची शक्यता अधिक वाढते. यामुळे कांदा ऑक्सिडाईज होतो.

कांदा कापल्यावर किंवा साले काढल्यावर त्यामधील सेल्स तुटून फ्लुईड्स रिलीज होतात. यातील न्यूट्रीएन्ट्सची क्षमता देखील बॅक्टेरियामुळे कमी होते. कोणत्याही वातावरणात कांदा सोलून किंवा चिरून ठेवल्यास त्यातून पाणी वाहायला सुरुवात होते. त्यामुळे यावर बॅक्टेरिया वाढतात. अशात कांदा खाणे आरोग्यासाठी अत्यंत नुकसानकारक ठरू शकते. चिरलेला कांदा बॅक्टेरियांसाठी चुंबकासारखे काम करतो.

अत्यंत गरज भासल्यास आपण कापलेला कांदा पेपर टॉवेलमध्ये गुंडाळून ठेवू शकता. किंवा फ्रीजमध्ये ठेवण्याची गरज भासलीच तर सीलबंद डब्यामध्ये भरून ठेवा. गरज असेल तेव्हाच कांदा कापून आहारात वापरावा.

लग्नाच्या 13 वर्षांनंतरही मुलं नाही!, प्रिया बापट म्हणते...

मराठीसह हिंदी सिनेसृष्टीतही अभिनेत्री प्रिया बापटने आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. प्रिया हिने आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली. अभिनेता उमेश कामतसोबत तिने १३ वर्षांपूर्वी लग्नगाठ बांधली. या मराठीतील लोकप्रिय असलेल्या जोडप्याला अद्याप बाळ नाही. त्यावरून अनेकदा प्रियाला विचारणा होत असते. या प्रश्नावर प्रिया बापटने मौन सोडले आहे. एका मुलाखतीत बोलताना प्रियाने बाळाबद्दल स्पष्टच उत्तर दिले. हॉटर फ्लायच्या मुलाखतीत प्रियाला बाळाबद्दलच विचारण्यात आलेल्या प्रश्नाला कसा हाताळतेस असे विचारण्यात आले. त्यावर प्रियाने म्हटले की, तुमचं लग्न झालं असेल आणि तुम्हाला बाळ असेल तरंच तुमचं आयुष्य पूर्ण होतं, असं लोकांना का वाटतं? असा सवाल तिने केला. ज्या जोडप्याला मुलं नकोत आणि त्या आनंदी आहेत, तरी त्यांना त्यांचं आयुष्य पूर्ण आहे, असे वाटत असल्याचे प्रियाने म्हटले. प्रिया मुलाखतीत पुढे म्हणाली की, आमच्या कपल फोटोवर बाळाबद्दल विचारणाऱ्या कमेंट्स असतात. उमेशच्या फोटोवर या कमेंट्स नसतात, अर्थात मी महिला असल्याने ही अपेक्षा माझ्याकडून आहे. पण मला जेव्हा वाटेल की बाळ हवंय, तेव्हा मी करेन, जर मला बाळ नको असेल तर मी नाही करणार असेही प्रियाने स्पष्ट म्हटले.एका नाटकानंतरचा प्रसंग सांगत प्रिया म्हणाली, उमेश आणि मी एकत्र नाटक करतोय त्या प्रयोगाला एक काकू आल्या. म्हणाल्या, आम्हाला गुडन्यूज पाहिजे.मी म्हणाले आताच तर अवॉर्ड्स मिळाले. गुडन्यूज मिळाली ना. पण त्या म्हणाल्या तू बाळ कधी करणार. मी उत्तर देईस्तोवर त्या तोच प्रश्न विचारत राहिल्या. मग मी त्यांना म्हणाले, काकू मला माझ्या आईनेही कधीच हा प्रश्न नाही विचारला, त्यामुळे प्लीज मला हा प्रश्न विचारू नका,यावर काय उत्तर द्यायचं हे मला कळत नाही. एका फोटोवर अनुष्का शर्माचा उल्लेख करत प्रेग्नन्सीबद्दल कमेंट्स आल्या, असा खुलासा प्रियाने केला. नुकताच मी पोलका डॉट प्रिंटचा काळ्या रंगाच्या ड्रेसवरचा एक फोटो पोस्ट केला होता. त्या फोटोवर प्रिया बापट प्रेग्नंट आहे, अशा कमेंट्स होत्या. अनुष्का शमार्ने तिच्या प्रेग्नन्सीवेळी पोलका डॉट ड्रेस घातला होता, त्यामुळे मी घातला तर त्यांच्यामते मी प्रेग्नंट आहे, असं म्हणत प्रिया हसू लागली.

'एका भूमिकेसाठी डान्सबारमध्ये घालवल्या अनेक रात्री', अदा शर्माचा खुलासा

'द केरळ स्टोरी' फेम अभिनेत्री अदा शर्मा हिला आता कोणत्याही ओळखीची गरज नाही. सिनेमात दमदार भूमिका साकारल्यानंतर अभिनेत्रीच्या लोकप्रियतेत तुफान वाढ झाली. सुनील ग्रोव्हरची वेब सिरीज सनफ्लॉवर २ झी ५ वर १ मार्च रोजी प्रदर्शित झाली. या वेब सिरीजच्या दुसऱ्या सीझनमध्ये अभिनेत्री अदा शमार्ही दाखल झाली आहे. या वेब सिरीजमध्ये अभिनेत्री रोझी मेहता ही बार डान्सरची भूमिका साकारत आहे. अदा शमार्ला अनेक रात्री डान्सबारमध्ये काढाव्या लागल्या दरम्यान आता अभिनेत्रीने सनफ्लॉवर २ मधील तिच्या भूमिकेबद्दल खुलासा केला आहे. अभिनेत्री म्हणते की तिने तिच्या भूमिकेसाठी डान्सबारमध्ये रात्र काढली. तिला पडद्यावर प्रभावी दिसायचे होते. अदा शर्मा म्हणाली, मला प्रभावी दिसायचे होते. फक्त नाचत असतानाच नाही, तर तुम्ही कसे बसता आणि उभे राहता आणि तुम्ही परफॉर्म करत नसताना तुम्ही तुमच्या शरीरासोबत किती आरामात आहात याविषयी आहे.अभिनेत्री पुढे म्हणाली की, कधीकधी ती ध्यान करण्यासाठी पहाटे ५ वाजेपर्यंत डान्सबारमध्ये राहायची. अभिनेत्री पुढे म्हणाली, ते इतके छान होते की त्यांनी मला बारमध्ये राहण्याची आणि गोष्टी पाहण्याची परवानगी दिली. बोलताना मी त्यांचा आत्मविश्वास पाहण्याचा प्रयत्न केला.

दै. लोकरक्षणाय सुडोकू - ४१

1		7			2		6	8
2	3				9			5
	6		4		1	7	3	
		1		4			8	
				9	7	5		
	9		1	2		4		
			6		5	3		
6						8		7
7		2	9					

उत्तर सुडोकू -४०

7	8	9	3	6	1	4	5	2
1	3	4	2	9	5	8	6	7
2	5	6	4	7	8	9	1	3
3	4	1	5	8	2	6	7	9
6	9	2	7	1	3	5	8	4
8	7	5	9	4	6	2	3	1
9	6	8	1	2	7	3	4	5
4	1	3	6	5	9	7	2	8
5	2	7	8	3	4	1	9	6

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

दिनविशेष

२७ मार्च

- १६६७: शिवरायांना सोडुन गेलेल्या नेताजी पालकरचे औरंगजेबाने धर्मांतर केले व यांचे नाव महंमद कुली खान ठेवले.
- १७९४: अमेरिकन नौदलाची स्थापना झाली.
- १८५४: क्रिमियन युद्ध झ इंग्लडने रशियाविरुद्ध युद्ध पुकारले.
- १९५८: निकीता क्रुश्चेव्ह सोविएत रशियाचे अध्यक्ष झाले.
- १९६६: २० मार्च रोजी चोरीला गेलेला फुटबॉलचा विश्वचषक दक्षिण लंडनमधील एका बागेत पिकल्स नावाच्या कुत्र्याला सापडला. त्यानंतर हा चषक १९८३ मधे पुन्हा चोरीला गेला, तो आजतागायत सापडलेला नाही.
- १९७७: तेनेरिफ द्वीपावरील धावपट्टीवर पॅन ॲम आणि के. एल. एम. या दोन बोइंग ७४७ प्रकारच्या विमानांची टक्कर होऊन ५८३ जण ठार झाले.
- १९९२: पंडित भीमसेन जोशी यांना मध्य प्रदेश सरकारचा तानसेन पुरस्कार प्रदान.
- २०००: चित्रपट निमार्ते व दिग्दर्शक बी. आर. चोप्रा यांना फाय फाउंडेशनतर्फे राष्ट्रभूषण पुरस्कार जाहीर.
- १७८५: फ्रान्सचा राजा लुई (सतरावा) यांचा जन्म. (मृत्यू: ८ जून १७९५)
- १८४५: नोबेल पारितोषिक विजेते जर्मन भौतिकशास्त्रज्ञ विलहेम रॉंटजेन यांचा जन्म. (मृत्यू: १० फेब्रुवारी १९२३)
- १८६३: रोल्स-रॉइस लिमिटेड चे निमार्ते हेन्री रॉयस यांचा जन्म. (मृत्यू: २२ एप्रिल १९३३)
- १९०१: डोनाल्ड डक चे हास्यचित्रकार कार्ल बार्क्स यांचा जन्म. (मृत्यू: २५ ऑगस्ट २०००)
- १८९८: भारतीय शिक्षणतज्ञ, समाजसुधारक आणि तत्त्ववेत्ते सर सय्यद अहमद खान यांचे निधन. (जन्म: १७ ऑक्टोबर १८१७)
- १९५२: टोयोटा मोटर कंपनीचे संस्थापक काइचिरो टोयोटा यांचे निधन. (जन्म: ११ जून १८९४)
- १९६७: नोबेल पारितोषिक विजेते झेक रसायनशास्त्रज्ञ जेरोस्लॉव्ह हेरॉव्हस्की यांचे निधन. (जन्म: २० डिसेंबर १८९०)
- १९६८: पृथ्वीप्रदक्षिणा करणारे पहिले अंतराळवीर युरी गागारीन यांचे निधन. (जन्म: ९ मार्च १९३४)
- १९९२: साहित्यिक, गरवारे वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. शरच्चंद्र वासुदेव चिरमुले यांचे निधन.
- १९९७: संगीत नाटकातील अभिनेते व गायक भार्गवराम आचरेकर यांचे निधन.

भविष्य

मेष तुमच्या व्यक्तिमत्वाची उत्तम छाप पडेल. व्यापारी वगार्ला चांगला आर्थिक लाभ होईल. नवीन मित्र जोडाल. झोपेची तक्रार जाणवेल.

वृषभ व्यवहारी बुद्धिमत्ता वापराल. व्यावहारिक कल्पकता वापराल. पुढील गोष्टींचा अंदाज बांधवा लागेल. काही बाबी

मिथुन मनातील आकांक्षा पूर्ण होतील. चांगली संगत लाभेल. कामाच्या ठिकाणी कौतुकास पात्र व्हाल. मोठ्या लोकांच्या संगतीत वावराल.

कर्क मानसिक ताणापासून दूर राहावे. घरातील वडीलधार्या व्यक्तींचे मत विरोधी वाटू शकते. अंगीभूत कलागुण विकसित होण्यास वाव द्यावा. अति विचार करणे टाळावे.

सिंह जोडीदाराशी विचार-विनिमय कराल. भागीदारीत नवीन योजना आमलात आणाल. मुलांच्या हट्टीपणा कडे लक्ष ठेवा. तुमच्यातील धार्मिकता वाढीस लागेल. इतरांच्या आनंदात

कन्या पत्नीची प्रगती होईल. तुमचा जनसंपर्क वाढेल. सर्दी, खोकला यांसारखे त्रास संभवतात. जुगारातून लाभ संभवतो. गुंतवणुकीचा नवीन पर्याय शोधाल.

तुला पत्नीचा वरचष्मा राहील. जोडीदाराचा लाडिक हट्ट पुरवावा लागेल. आरोग्यात सुधारणा होईल. जवळचा प्रवास जपून करावा. कामाचा जोम वाढेल.

वृश्चिक बोलतांना सारासार विचार करून बोलावे. कसलाही उतावीळपणा करायला जाऊ नये. कौटुंबिक खचार्चे योग्य नियोजन करावे. घरात नातेवाईक जमा होतील. दिवस हसत-खेळत घालवाल.

धनु रागाचा पारा आवरता घ्यावा लागेल. आततायीपणे वागू नये. कामाचा जोम वाढीस लागेल. काही अनपेक्षित बदल संभवतात. नातेवाईकांशी मतभेदाची शक्यता आहे.

मकर सामुदायिक गोष्टीपासून दूर राहावे. स्त्रीवगार्पासून सावधानता बाळगावी. धार्मिक यात्रा कराल. प्रवासात सावधानता बाळगावी लागेल. वादविवादात सामील होणे टाळा.

कुंभ मनमोकळ्या गप्पा मारता येतील. तुमच्या संभाषण कौशल्यावर सर्व खुश होतील. व्यावहारिक चातुर्य दाखवून द्याल. कौटुंबिक जबाबदारी पेलाल. हातातील कला जोपासावी. पोटाच्या तक्रारी जाणवू शकतात.

मीन वेळेचे महत्व जाणून वागावे. कोणालाही शब्द देतांना विचार करावा. व्यावसायिक लाभाचे योग्य नियोजन करावे. चटपटीत पदार्थ खाल. आवडी-निवडी बाबत दक्ष राहाल.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

संपादकीय

सोनेदराची झळाळी काय सांगतेय?

सोन्याचं 'मोल' काय राहील, हे ठामपणे सांगणारी ठोस अशी कोणतीही पद्धती व मोजमाप नाही. सोन्याच्या किमतीवर परिणाम करणाऱ्या निरनिराळ्या अर्थिक घटकांच्या संदर्भात गुंतवणूकदारांचा काय दृष्टिकोन आहे आणि त्या बाबतीतल्या त्यांच्या भविष्यकालीन अपेक्षा काय आहेत, यावर सोन्याच्या किंमतीत चढउतार दिसून येतात. सध्याच्या वाढीची नेमकी कारणे समजून घेतली पाहिजेत. माणसाचं सोन्याचं आकर्षण न संपणारं आहे. सर्वसामान्यांपासून ते निरनिराळ्या आर्थिक संस्था, बँका, व्यापारी अगदी रिझर्व्ह बँकेपर्यंत सोने प्रत्येक ठिकाणी हवेहवेसे आहे. मात्र सोन्याच्या या आकर्षणाची कारणं वेगवेगळी आणि परिणामदेखील वेगळे. गेल्या काही दिवसांत सोन्याच्या किंमती सातत्यानं वाढताहेत. उदाहरणार्थ, जागतिक बाजारात सोन्याची किंमत खूपच वाढून अंशामागे २,१८२.७५ अमेरिकी डॉलर झाली. भारतीय बाजारात सोन्यानं ६६ हजार (१० ग्रॅम) चा टप्पा सहज पार केला. पण गंमत अशी की, फक्त सोनंच वाढत नाहीये. सोन्याबरोबर स्टॉकच्या किंमती आणि जागतिक व्याजाचे दरदेखील वाढताहेत. म्हणजे तीनही गोष्टी एकाचवेळी वाढणं ही अशक्य वा अपूर्व बाब नव्हे. पण अपवादात्मक परिस्थितीत नक्कीच आहे. या परिस्थितीला जबाबदार कारणंदेखील वेगळी आहेत. अगदी सामान्य परिस्थितीत आर्थिक विकासाचा, प्रत्यक्षातील आणि अंदाज बांधलेला दर चांगला असेल तर गुंतवणूकदार स्टॉक खरेदी करणं पसंत करतात. अशावेळी बाँड (सरकारी रोखे वा ऋणपत्र) व सोन्याची खरेदी दुय्यम ठरते. त्याउलट अर्थव्यवस्थेत व्याजाचे दर अधिक असतील तर स्थिर उत्पन्न वा परतावा देणाऱ्या सेटस्ना अर्थात 'बाँड'सारख्या गुंतवणुकीला अधिक पसंती दिली जाऊ शकते. अशावेळी सोन्यामधली गुंतवणूक कमी होऊ शकते. मग स्टॉक आणि वाढणाऱ्या व्याजदराबरोबर सोन्याचे भाव का वाढतायत? वर्तमानकाळात आणि भविष्यात सोन्याचं मोल काय राहील, हे ठामपणे सांगणारी ठोस अशी कोणतीही पद्धती व मोजमाप नाही. सोन्याच्या किमतीवर परिणाम करणाऱ्या निरनिराळ्या अर्थिक घटकांच्या संदर्भात गुंतवणूकदारांचा काय दृष्टिकोन आहे आणि त्याबाबतीतल्या त्यांच्या भविष्यकालीन काय अपेक्षा आहेत, यावर सोन्याच्या किंमतीत चढउतार दिसून येतात. त्याचबरोबर भू-राजकीय अनिश्चिततेची परिस्थिती व जागतिक किंमतवाढ या घटकांचा देखील गुंतवणूकदार कोणत्या 'ॲसेट'मध्ये वा सोन्यामध्ये गुंतवणूक करतात यावर सोन्याची किंमत ठरू शकते. जगात आता सोन्याचे भाव वाढतायत. याला अमेरिकन फेडरल रिझर्व्हची किंमतवाढ व किंमत नियंत्रणांसंबंधीची गोंधळात टाकणारी भूमिका अवलंबून आहे. व्याजाचे दर केव्हा घटवायचे या बाबतीतली संदिग्धता व त्यासंदर्भात केलेली निरर्थक विधाने यातून प्रत्यक्षातली किंमतवाढ अपेक्षेपेक्षा जास्त झाली व ह्यफेड रिझर्व्हह्ला २ टक्क्यांचं किंमत नियंत्रणाचं उद्दिष्ट पूर्ण करता आलं नाही. यासारख्या अनिश्चिततेच्या परिस्थितीत सोन्याची मागणी कमी होण्याऐवजी वाढली. त्यातून सोन्याच्या किंमतीत वाढ होताना दिसते आहे. जेव्हा किमती वाढतात तेव्हा सोन्याला असलेली मागणी मागणी वाढते. त्याचे कारण किंमतवाढीत चलनाचं मूल्य कमी होतंय. लोक अन्य ॲसेटच्या तुलनेत सोन्याला पसंती देतात. ज्यावेळी व्याजाचे दर वाढतात, तेव्हा अधिक परताव्यासाठी लोक (गुंतवणूकदार) बाँडला पंसती देतात. मात्र व्याजाच्या दराची पातळी अशी हवी की, ती किमतवाढीमुळे होणारं वास्तव मूल्याचं नुकसान भरून काढू शकेल. नेमका या बाबतीतला विश्वास 'फेड रिझर्व्ह'नं गुंतवणूकदारांना दिला नाही. त्यामुळे बाँड वा अन्य 'ॲसेट'ना मागणी न वाढता सोन्याची मागणी वाढत गेली व त्यातून किंमतवाढ होते आहे. युरोपियन सेंट्रल बँकेनंदेखील अशाच प्रकारचे धोरण राबवून किंमतवाढीत भर घातली.त्याचबरोबर जगातल्या बहुतेक सर्व सेंट्रल बँकांनी वाढणाऱ्या सोन्याच्या मागणीत भर घातली. उदाहरणार्थ 'वर्ल्ड गोल्ड कौन्सिल'च्या आकडेवारीनुसार २०२३ मध्ये सोन्याची मागणी ४८९९ टन एवढी अधिक होती.त्याचबरोबर मध्यवर्ती बँकांकडून जानेवारी २०२४ मध्ये ३९ टनांची भर सोन्याच्या साठ्यातच घेतली गेली. २०२३ च्या तुलनेत ही भर दुपटीची होती. रिझर्व्ह बँकेनंदेखील २०२४मध्ये नऊ टन सोन्याची खरेदी केली. जुलै २२ नंतरची ही सर्वाधिक खरेदी म्हणता येईल.खरेदीची कारणेमध्यवर्ती बँकाकडून सोन्याची खरेदी दोन कारणासाठी केली जाते. एक म्हणजे किंमतवाढीच्या परिस्थितीत राखीव चलनाची किंमत घसरते. अशावेळी सोन्याच्या साठ्याचा उपयोग होऊ शकतो. दुसरे कारण भू-राजकीय आहे.उदाहरणार्थ रशिया-युक्रेन युद्धामुळे चीन व रशिया यांसारख्या देशांवरची वित्तीय जोखीम वाढलेली आहे. अशा परिस्थितीत आपल्याला भू-राजकीयदृष्ट्या अधिक प्रबळ करायचे असेल, तर डॉलरच्या साठ्यापासून दूर जाऊन, सोन्याचा साठा वाढवायला हवा. याच भूमिकेतून चीनची सोन्याची खरेदी वाढत गेली. ह्यातून सोन्याची एकूण किंमत वाढून त्याचा किंमतीवर परिणाम होतोय.गेल्या काही वर्षांमध्ये वाढत चाललेल्या आर्थिक अनिश्चिततेच्या परिस्थितीत अर्थिक विकासाचं ठराविक उद्दिष्ट गाठायचं असेल व त्यासाठी प्रभावी वित्तीय व राजकोषीय धोरण राबवायचं असेल तर कर्ज हा प्रभावी उपाय आहे, अशी मानसिकता तयार झाली.यातून अमेरिका, जपान, ब्रिटन, फ्रान्स ह्या देशावरचे कर्जांचे ओझे वाढत गेल्याचे दिसतं. उदाहरणार्थ, अमेरिकेचे कर्ज व जी. डी. पीच्या गुणेत्तराचे प्रमाण ६० टक्क्यांवरून १२० टक्क्यांपर्यंत गेल्याचं दिसते. अशा वाढत चाललेल्या कर्जांच्या संकटप्रसंगी सोन्याचा साठा 'बचावाचं' (हेजिंग) साधन म्हणून आधिक प्रभावी ठरू शकतो.

आपले 'आप'शी कसले नाते?

अरबिंदो फार्माच्या संचालकांना जामीन, या कंपनीची निवडणूक रोखेखरेदी आणि अरविंद केजरीवालांवरील आरोपांच्या कामी त्या संचालकांची मदत. शिमग्याच्या सणास यंदाइतकी रंगतदार पार्श्वभूमी फारच कमी वेळा मिळाली असेल. निवडणुका जाहीर झालेल्या आहेत, एकतर्फी पक्षांतरांची गती वाढलेली आहे, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ म्हणवून घेणाऱ्या आम आदमी पक्षाचे अरविंद केजरीवाल यांस अखेर तुरुंगात पाठवण्यात यश आलेले आहे आणि या सगळ्यास निवडणूक रोख्यांची झणझणीत फोडणी मिळालेली! तेव्हा या सगळ्यामुळे यंदाचा शिमगा अधिकच रंगतदार होणार यात तिळमात्रही शंका नसावी. धुळवडीच्या दिवशी रंगांची पुटे चढवली गेल्याने मूळचा चेहरा ओळखणे अवघड जाते. त्यामुळे अनेकांस निवडणुकीच्या काळात शिमग्याचा सण येणे ही या अथार्ने पर्वणीच वाटू शकेल. शिमगा सणाचा आणखी एक फायदा म्हणजे बंद मूठ तोंडाच्या चंबूवर ठेवत अधिकृतपणे बोंब ठोकता येते. एरवी अशा पालथ्या मुठीच्या बोंबा असंस्कृत आणि अभद्र मानल्या जातात. शिमगा या सणाचा अपवाद. जे जे अभद्र आणि अमंगळ ते सर्व करण्याची मुभा हा सण देतो. राजकीय कार्यकर्त्यांसाठी, राजकारण्यांसाठी अशी संधी निवडणुकांमुळेही मिळते. राजकीय बाहेरख्यालीपणा, राजकीय विवाह बाह्य संबंध, एकाच वेळी दोन-दोन वा अधिक घरोबे इत्यादी सारे निवडणुकीच्या निमित्ताने चर्चिले जाते आणि निवडणुकांमुळे सर्वसामान्य भारतीयाची अधिकच असलेली क्षमाशीलता आणखीच वाढत असल्याने सर्व काही गोड मानून घेतले जाते. म्हणून निवडणुका आणि शिमगा एकत्र येणे म्हणजे हाती एकदम डबल बॅरल बंदूकच! असो. हा शिमगा आणि राजकीय धुळवड यांची चर्चा करू जाता दोन मुद्दे आ वासून समोर उभे ठाकतात. पहिले म्हणजे माजी वित्त सचिव सुभाष चंद्र गर्ग यांचे विधान. त्यांच्या प्रतिपादनाची दखल घ्यावयाचे कारण निवडणूक रोखे ही कल्पना जेव्हा सरकारात मांडली आणि अमलात आणली जात होती त्या वेळी त्यात गर्ग यांचा महत्त्वाचा वाटा होता. तरीही निवडणूक रोखे हा भारताच्या इतिहासातील केविलवाणा अध्याय असल्याचे गर्ग यांस वाटते आणि हे मत ते निर्भयपणे व्यक्त करतात. या दोन्ही बाबी तशा दुर्मीळ! गर्ग यांस असे वाटते कारण मुळात या रोख्यांवर असलेला विशिष्ट क्रमांक नोंदवून ठेवण्याची स्टेट बँकेची कृती. या रोख्यांचा मूळ उद्देश अधिकाधिक पांढरा पैसा निवडणुकीत यावा, हा होता. तसेच हे रोखे कोणी कोणास किती प्रमाणात दिले हेदेखील उघड न होणे अपेक्षित होते. तथापि स्टेट बँकेने हे पथ्य पाळले नाही, असे गर्ग म्हणतात. बँकेने हे रोखे विकताना स्वतःकडे या रोख्यांचा विशिष्ट क्रमांक नोंदवून ठेवला, हे कृत्य बेकायदा ठरते, असे गर्ग यांचे मत. यामुळे रोखे खरेदीदार आणि ज्यांस ते दिले गेले ते यांच्यातील गोपनीयतेचा भंग होतो, असे गर्ग म्हणतात. त्यांच्या मते ही गोपनीयता रोखे व्यवहारांत पहिल्यापासून अभिप्रेत होती. तथापि हे जर खरे असेल तर मग स्टेट बँकेने केलेला खोटेपणा दुहेरी ठरतो. पहिल्यांदा रोख्यांचा ताळमेळ लगेच आम्हास करता येणार नाही असे बँकेने सर्वोच्च न्यायालयात सांगणे, हे कारण पुढे करत ३० जूनपर्यंतची मुदतवाढ मागणे आणि सर्वोच्च न्यायालयाने ही मागणी फेटाळल्यावर अवघ्या २४ तासांत हा तपशील सादर करणे हे सारेच अतर्क्य आणि अचंबित करणारे ठरते. आणि ह्यस्टेट बँकेने आपल्या बेकायदा कृतीने रोख्यांचे उद्दिष्टच पराभूत केलेह्ल, असे आता हे गर्ग म्हणतात तेव्हा ते वाचून हसावे की रडावे हा प्रश्न पडावा. म्हणजे मुळात अनैतिकतेस थारा देणाऱ्या सरकारी योजनेच्या अंमलबजावणीत अनैतिक मागार्चा अवलंब झाला, असा त्याचा अर्थ. हे एक. दुसरा मुद्दा आप चे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांच्या अटकेचा. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराच्या आरोपास पुष्टी मिळाली कोणी सरदचंद्र रेड्डी ही सत्यवचनी व्यक्ती माफीचा साक्षीदार बनल्यामुळे. त्याविषयी आपण आक्षेप घेण्याचे कारण नाही. पण या सत्यवचनी रेड्डी यांच्यावर केंद्र सरकारच्या भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ असलेल्या सक्तवसुली संचालनालयाने कारवाई केली आणि ती झाल्यावर अचानक उपरती होऊन त्यांनी पाच कोटी रुपयांचे रोखे खरेदी केले. तेही ठीक. अशा वेळी बसगाडयांत ज्याप्रमाणे आपत्कालीन परिस्थितीत बाहेर पडण्याचा मार्ग दाखवलेला असतो त्याप्रमाणे अशा कारवायांतही तो न दाखवताही अनेकांस दिसतो. त्याप्रमाणे हे पाच कोटींचे रोखे सत्ताधारी पक्षास दिले गेले. नंतर या सत्यवचनी रेड्डी यांनी २०२३ च्या मे महिन्यात दिल्ली उच्च न्यायालयात जामिनासाठी रीतसर याचिका केली. तीस तितक्याच सत्यवचनी सक्तवसुली संचालनालयाने अजिबात विरोध केला नाही. हा एक दुर्मीळ योग. एरवी लुंग्यासुंग्यांच्या जामिनासही प्राणपणाने विरोध करणाऱ्या सत्यवचनी सक्तवसुली संचालनालयास या रेड्डी यांची मात्र दया आली आणि त्यांचा जामिनाचा अर्ज विनासायास मंजूर झाला. या रेड्डी यांस कंबरदुखी असल्याने मानवतेच्या वैद्यकीय कारणास्तव यांस विरोध झाला नाही, असे म्हणतात. हे वाचून तुरुंगात खितपत पडलेले एके काळच्या जेट एअरवेजचे संस्थापक नरेश गोयल यांस हुंदका अनावर होईल. हे एकेकाळचे धनाढय आणि आता वयोवृद्ध गोयल कर्करोगग्रस्त असूनही त्यांच्या जामिनास विरोध केला जातो आणि या रेड्डी यांस कंबरदुखीसाठी सहज जामीन मिळतो, असा हा फरक. तो गोयल यांनी का लक्षात घेतला नाही आणि त्यांनीही रोखे-मार्ग का निवडला नाही, हे कळणे अवघड. कदाचित प्रमोद महाजनांसारखा सल्लागार नसल्यामुळे त्यांची ही अवस्था झाली असावी. असो. तर जामीन मिळाल्यानंतर साधारण महिनाभरात हे सत्यवचनी रेड्डी हे दिल्लीच्या कथित मद्यघोटाळ्यात माफीचा साक्षीदार बनले. यामुळेही असेल पण तुरुंगात खितपत पडण्यापेक्षा माफीचा साक्षीदार होत माफी मिळाल्यामुळे कृतकृत्य झालेल्या या रेड्डी यांनी आणखी पंचवीसेक कोटी रुपयांचे रोखे खरेदी केले आणि ते ज्या पक्षास देण्यात शहाणपण असते त्या(च) पक्षाला दिले.

हे रेड्डी अरिबदो फार्माचे संचालक. या कंपनीने साधारण ५५ कोटी रुपयांचे रोखे खरेदी केले आणि त्यापैकी ३४.५ कोटी रु. हे भाजपस दिले. हेच रेड्डी माफीचा साक्षीदार बनून अरविंद केजरीवाल यांच्यावरील कारवाईत महत्त्वाची भूमिका निभावते झाले आणि भ्रष्टाचारी वगैरे अरविंद केजरीवाल आणि सत्यवचनी, नैतिक भाजप यांस जोडणारा समान दुवा ठरले. हे नाते चमत्कारिक. तेव्हा प्रश्न असा की सत्यवचनी सक्तवसुली संचालनालय या नात्याची, त्यातील दुव्याचीही चौकशी करणार का? अशी चौकशी व्हावी यासाठी देशातील नवनैतिकवादी आपल्या मताचा किमान समाजमाध्यमी रेटा तरी लावणार का? सत्यवचनी प्रभू रामचंद्र हा भारताचा आदर्श. त्यातही नवनैतिकवाद्यांचा अधिक. एका परिटाने केवळ संशय घेतला म्हणून प्रभू रामचंद्रांनी आपल्या अधार्गीस अग्निपरीक्षेस सामोरे जायला लावले. येथे तर केवळ संशयापेक्षाही बरेच काही हाती आहे. असे असताना प्रभू रामचंद्रांस आदर्श मानणाऱ्यांनी अग्निपरीक्षेचा नाही तरी गेलाबाजार नुसत्या परीक्षेचा आग्रह धरणे रामभक्तीस न्याय देणारे ठरेल. या नात्यांची चौकशी व्हायला हवी आणि रेड्डी यांच्या माफीनाम्यामागील कारणेही उजेडात यायला हवीत. नपेक्षा या नवनैतिकवाद्यांस (कुसुमाग्रजांची क्षमा मागून) आपले आप शी कोणते नाते? असा प्रश्न विचारता येईल. त्याचे उत्तर अस्वस्थ करणारे असेल.

दिव्यांग मतदाराच्या मदतीला 'सक्षम' ॲप

■ **अलिबाग** : लोकसभा निवडणुकीत जास्तीत जास्त मतदान व्हावे यासाठी निवडणूक आयोग सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. एकही मतदार आपल्सा मतदनाच्या हक्कापासून वंचित राहणार नाही याची काळजी घेतली जात आहे. ४० टक्क्यांहून अधिक दिव्यांग असणाऱ्या व्यक्तींसाठी आणि ८५ वर्षे पूर्ण झालेल्या वयोवृद्धांना मतदान प्रक्रिया सुलभ होण्याच्या दृष्टीने सुरू केलेल्या 'सक्षम' ॲपच्या माध्यमातून अधिकच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत.

या सक्षम ॲपवर दिव्यांग मतदारांसाठी दिव्यांग म्हणून नोंदणी करण्याची, नवीन मतदार नोंदणीसाठी, मत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हस्तांतरित करणे, मतदान केंद्र बदलाची व व्हीलचेअरची विनंती करता येत असून मतदार यादीत नाव शोधण्याची, मतदान केंद्र जाणून घेणे, तक्रारी नोंदविणे, मतदान अधिकारी शोधणे, बूथ लोकेटर स्थिती तपासणे इत्यादी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

हे ठरतील नोंदणीस पात्र

सक्षम ॲपवर अंधत्व, अल्प दृष्टी, बहिरेपणा, कमी श्रवणशक्ती, शारीरिक व्यंग, मानसिक आजार (मानसिक सामाजिक अपंगत्व), कुष्ठरोग, बौद्धिक अपंगत्व, सेरेब्रल पाल्सी, बौनेत्व, मस्कुलर डिस्ट्रोफी, ॲसिड हल्ल्यातील बळी, भाषण आणि भाषेतील अपंगत्व, विशिष्ट शिकण्याची अक्षमता, ऑटिझम, स्पेक्ट्रम विकार, मल्टिपल स्क्लेरोसिस आणि पार्किन्सन रोगासह क्रॉनिक न्यूरोलॉजिकल विकार, हिमोफिलिया, थॅलेसेमिया आणि सिकलसेल, ॲनिमियासह रक्त विकार आणि एकाधिक अपंगत्व असलेल्या व्यक्ती नोंदणी करू शकतात.

रायगड मतदारसंघात एकूण ८ हजार ४६ दिव्यांग मतदार आहेत. यापैकी २ हजार ९३३ महिला तर ५ हजार १३३ पुरुष मतदार आहेत.

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्ह्यात दिव्यांग व्यक्तींसाठी सर्व ठिकाणी मतदान केंद्र तळमजल्यावर असतील. तेथे पिण्याचे पाणी, प्रतीक्षा शेड, वैद्यकीय किट, सुलभ शौचालय, मतदान केंद्रांवर पुरेशी विद्युत आणि प्रकाश व्यवस्था, केंद्रांवर रॅम्प आणि व्हीलचेअरची सोय, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांसाठी प्राधान्याने प्रवेश सुविधा, स्वतंत्र रांगेची सुविधा, मानक चिन्हे आणि साइन बोर्ड असतील. मतदान केंद्रावर स्वयंसेवक सहाय्य उपलब्ध असणार आहे. अंध आणि अशक्त मतदारांच्या मतांची नोंद करण्यासाठी ईव्हीएम वर ब्रेल लिपीची व मदतनीसाची सुविधा देखील उपलब्ध आहे.

शहापुर तालुक्याची मदार आता पाणी टँकरवर

उन्हाचा पारा वाढत असल्याने पाणी टंचाई होवू लागली अधिकच तीव्र

■ **कसारा** - भूगर्भात कमी होणारी जलाशयाची पातळी एकीकडे,तर दुसरीकडे लहान-मोठे जलस्त्रोत असलेले नदी नाले विहिरी कोरडी पडल्याने कसारा पंचक्रोशीतील मदार आता केवळ टँकरवरच आहे.यंदाच्या फेब्रुवारी अखेरीला टँकर सुरु करण्याची वेळ आली तेव्हापासून टँकरच्या मागणीत भरच पडत आहे.मार्च महिन्याच्या मध्यात उन्हाची तीव्रता अधिक दृढ झाल्याने कसारा पंचक्रोशीतील ढाकणे ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील वाड्या वस्त्यांवर पाणी टंचाई निर्माण झाली आहे.शासनाच्या टँकरवर मदार असलेल्या चिंध्याचीवाडी, धुपारवाडी, गावंडवाडी आणि वाघ वाडीतील ग्रामस्थांनाही पाण्याच्या टँकरची चाहूल लागली आहे. शहापुर तालुक्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य गहिरे बनले असून,दिवसेंदिवस टँकरद्वारे पुरवठा करण्याच्या मागणीने जोर पकडला आहे.गावात टँकर येतो, हाच काय तेवढा दिलासा, असे चित्र आहे.१० गावे आणि ७० वाड्या-वस्त्यांसाठी २३ टँकर सुरु असलेल्या शहापुर तालुक्यातील टँकरच्या मागणीत दिवसेंदिवस वाढ होत आहे.

आता नाव्याने ढाकणे ग्रामपंचायतीने तालुका प्रशासनाकडे ४ वाड्यावस्त्यांसाठी टँकरसाठी प्रस्ताव सादर केला आहे.मात्र प्रशासनाकडून प्रस्तावाला मंजुरी मिळाली नसल्याने टँकरच्या प्रतीक्षेत नागरिक आहे.या ४ वाड्यांची लोकसंख्या १२१५ असून जनावरांचा आकडा १७९ पर्यंत पोहचला आहे.तर प्रत्येक वाडीत जलस्त्रोत म्हणून एकेक विहीर आहे. परंतु या विहिरींचेही पाणी आटू लागल्याने नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे.

◆ परंतु जिल्हा प्रशासन स्तरावरून टँकरचे प्रस्ताव मंजूर होण्यास विलंब होत असल्याने थेंबभर पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत असल्याचे मत ढाकणे परिसरातील ग्रामस्थ करत आहेत.

◆ तालुक्यात इतरत्र भागातही पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवत असल्याच्या पाश्वभूमीवर एकीकडे आटलेले जलस्त्रोत,तर दुसरीकडे नळपाणी पुरवठा बाबत शासनाची असलेली अनास्था यामुळे नजीकच्या काळात पाण्यासाठी दाही दिशा फिरण्याची नामुष्की ओढवली आहे.मात्र,टंचाईसदृश्य परिस्थितीशी मुकाबला करण्यासाठी प्रशासन केवळ टंचाई आराखड्यापुरते उरले असल्याचे चित्र आहे

Chennai Super Kings's new method: All-out attack with the bat

■ **Chennai:** These are still early days into the IPL 2024, but there is new found intent and purpose in Chennai Super Kings' batting might. Blessed with batting depth all the way till No 9 — which can extend even further – CSK are looking to break the glass ceiling where the strike-rate has taken total precedence over other batting metrics. Sample this. On Friday, in pursuit of Royal Challengers Bengaluru's target of 174, Chennai's batting line-up drifted away from their usual conventional approach where one among the top three bats the distance. Instead, their line-up came with the sole intention of keeping the pressure on the RCB's bowlers at all times. Barring their skipper Ruturaj Gaikwad who fell early, their other five batsmen marched on at a strike-rate of: 246.66, 142.10, 122.22, 121.42, 147.05. Though none of them scored above 37, Chennai got home in 18.4 overs."I'm not sure," head coach Stephen Fleming said if he wants a big score from one of their batsmen. "What I do know, I really like the intent of the batters. We have a longer batting line-up with the extra player (Impact Player), and I thought the intent that our batters showed was great.

Mumbai overtakes Beijing to become Asia's new billionaire capital

■ Mumbai

The Hurun Global Rich List for 2024, released on Tuesday, revealed shifts in the wealth landscape, with Indian tycoons Mukesh Ambani and Gautam Adani making headlines for their remarkable gains. "Mumbai was the fastest-growing billionaire capital in the world, adding 26 in the year and taking it to third in the world and Asia's billionaire capital. New Delhi broke into the Top 10 for the first time," the report states. Mukesh Ambani, chairman of Reliance Industries, retained his title as Asia's richest person, while Gautam Adani, founder of the Adani Group, saw a staggering surge in wealth, propelling him to the 15th spot in the global rankings. India's economic prowess was further underscored by the remarkable surge in its billionaire population. The country added a staggering 94 new billionaires, the highest of any nation except the United States, bringing the total to 271 ultra-high-net-worth individuals.



This surge, the highest since 2013, is a testament to the soaring confidence in the Indian economy, as noted by Rupert Hoogewerf, the institute's chairman and chief researcher. Indian billionaires' cumulative wealth reached US$1 trillion, surpassing China's average wealth per billionaire (US$3.2 billion vs US$3.8 billion), the 2024 Hurun Global Rich List report states. The report highlights that industry-wise the pharmaceutical sector leads the pack with 39 billionaires, followed by the automobile and auto components industry (27), and the chemicals sector (24). Collectively, the wealth of Indian billionaires amounts to a phenomenal $1 trillion, accounting for 7 per cent of the global billionaire wealth, reflecting the country's substantial economic influence. The rise of startups, particularly in the booming Artificial Intelligence (AI) space, is a significant contributor as well.

This trend aligns with the global focus on AI, which emerged as the biggest driver of wealth creation, generating over half of all new wealth this year. With a young, tech-savvy population and a growing focus on innovation, India is well-positioned to capitalise on this AI revolution, potentially fuelling the creation of even more billionaires in the coming years, the report added. Leading the Indian billionaire list is Mukesh Ambani, the chairman of Reliance Industries, with a staggering net worth of $115 billion.

'भविष्याच्या दृष्टिकोनातून जलजागर महत्त्वाचा'

■ 'पाणीदार माणसे... या पुस्तकातून ज्या ज्या व्यक्तींनी समाजाच्या उत्कर्षासाठी जलजागर केला आहे, त्यांचे केवळ ऋण न मानता, त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन काम केले पाहिजे. त्यातूनच एक नवा सक्षम समाज, एक नवा स्वयंपूर्ण देश घडू शकेल,' असा आशावाद त्यांनी यावेळी बोलून दाखवला. निशिकांत महांकाळ यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ पत्रकार राजेश दाभोळकर, साहित्यिक विनोद पितळे, पर्यावरण अभ्यासक कविता वालावलकर, युवा सामाजिक कार्यकर्ते संदीप पवार, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणारे निशिकांत महांकाळ तसेच सिद्धी फ्रेण्ड्स पब्लिकेशनचे प्रकाशक आणि संगणक प्रशिक्षक सुभाष कुदळे आदी मान्यवर उपस्थित होते.

■ **ठाणे** : 'मुबलक आणि सहज मिळणाऱ्या पाण्याचा अपव्यय टाळायचा असेल तर जलजागर महत्त्वाचा आहे. त्यातून भविष्यातल्या पाणी प्रश्नाला उत्तर मिळू शकते. अन्यथा, पाण्यावाचून जगण्याची भयावह स्थिती निर्माण होऊ शकते. अशा परिस्थितीतही पाण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांचे कार्य नक्कीच स्पृहणीय आहे. प्रत्येक माणसाने अशा उपक्रमांना प्राधान्य दिले पाहिजे आणि त्यात सहभाग नोंदवला पाहिजे,' असे मत ज्येष्ठ विधिज्ञ, 'प्रयास'चे समन्वयक आणि सामाजिक कार्यकर्ते ॲड. सुनिल तिवारी यांनी व्यक्त केले. जागतिक जल दिनानिमित्त साहित्यिक पत्रकार पर्यावरण कार्यकर्ते मनीष वाघ यांच्या 'पाणीदार माणसे... जीवन त्यांना कळले हो' या पुस्तकाचे प्रकाशन करताना ते बोलत होते.

प्रारंभी लेखक मनीष वाघ यांनी पुस्तकामागील आपली भूमिका विषद केली. राजेश दाभोळकर यांनी पत्रकार म्हणून पर्यावरण, प्रदूषण आणि पाणीप्रश्नांविषयी आपली मते मांडली. कविता वालावलकर यांनी सध्या सुरू असलेल्या जलप्रदुषणाच्या संदर्भात होत असणाऱ्या प्रयत्नांची माहिती दिली. विनोद पितळे यांनी केवळ लेखनापुरताच हा विषय सीमित न राहता प्रत्यक्षात काम करण्यावर आपला भर असल्याचे सांगितले. ॲड. तिवारी यांनी आपल्या भावना व्यक्त करताना, विविध स्तरावरून पाण्याचे महत्त्व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करण्यावर भर दिला असल्याचे नमूद केले.

'अजित पवार श्रीकांत शिंदेंना पाडायचे काम करतात'



■ **ठाणे** : कळवा-खारेगाव येथील मैदान बंद करण्यावरून येथील मते महायुतीच्या विरोधात जाणारी आहेत. अशाप्रकारे अजित पवार कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या विरोधात काम करून, त्यांना पाडायचे काम करत आहे. असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी रविवारी ठाण्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना केला.महसूल विभागाच्या मार्फत कळवा येथील खेळाचे मैदान बंद करण्याच्या मुद्दयावर आव्हाड रविवारी बोलत होते.

अजित पवार तुम्ही छोटया राजकारणात पडू नका, तुम्ही मुख्यमंत्री होण्याची ताकद असलेले मोठे नेते आहात, हे मी मान्य करतो. असे बोलून चिमटा काढताना, तुमच्या नेतृत्वातील उणीवा जाहिररित्या दाखवू नका, पटकन कोणी कानात बोलले म्हणून ऐकू नका असा राजकीय सल्लाही आव्हाड यांनी दिला. केवळ मला त्रास दयायचा म्हणून निधी द्यायचा नाही, फाईल आडवायच्या, खोट्या केसेस टाकायच्या हे सर्व चालेल. पण, लहान मुलांचा खेळ बंद होऊ देणार नाही. तुम्हाला हात जोडून विनंती करतो. छोटया राजकारणात अडकू नका, यातून आपली नाहक बदनामीच होते. असे आव्हाड म्हणाले.

आपण भविष्य घडवणारी विकसनशील माणसे आहात, त्याला धक्का लावू नका. असेही आव्हाड यावेळी म्हटले. उद्या जर येथील मैदानात खेळण्यास बंदी घातली तर त्याच मैदानाच्या आतमध्ये आमरण उपोषण सुरू करू असा इशाराही यावेळी आव्हाडांनी दिली. दरम्यान, कल्याण येथे अजित पवार यांनी ठाण्यात गुंडगिरी वाढली आहे. हे मुख्यमंत्री यांच्याविरोधात वक्तव्य आहे. पण पुण्यात शरद मोहोळ आणि परवा जी हत्या झाली. त्यामुळे तुम्ही तुमच्याकडे बघा असे ठणकावून सांगितले. आमच्या ठाण्याच्या मुख्यमंत्र्यावर कशाला बोलता असे उदगार काढत आव्हाडांनी मुख्यमंत्र्यांच्या बाजूने बॅटिंग केली. तसेच हे प्रकरण येथेच थांबवा संघर्षाची ठिणगी पडली तर आम्ही मागे जाणार नाही असा इशाराही आव्हाडांनी यावेळी दिला.

जाब विचारणाऱ्याची हत्या करणाऱ्या तिघांना जन्मठेप

सात वर्षांपूर्वीचे प्रकरण

■ यात दोन लाल रंगाच्या स्लिपर रबरी चप्पल, रक्ताचे डाग असलेला चाकू, होंडा कंपनीची युनिकोर्न दुचाकी यांचा समावेश होता. त्यांनी न्यायालयात सादर केलेले साक्षीदार, मुद्देमाल आदि ग्राह्य धरत आरोपी शिवम वेदप्रकाश तिवारी, राहुल यादव आणि आशिषकुमार उर्फ लल्ला रामचंद्र निषाद यांना जन्मठेपेची शिक्षा आणि प्रत्येकी १० हजाराचा दंड अशी शिक्षा गुरुवारी ठोठावली.दंडाची रक्कम न भरल्यास ३ महिन्याची साधी कैद भोगावी लागणार असल्याचेही निकालात नमूद करण्यात आलेले आहे.

■ **ठाणे** : परिचयातील महिलेची बदनामी केल्याप्रकरणी जाब विचारणाऱ्याची हत्या करणाऱ्या तसेच इतर दोघांवर प्राणघातक हल्ला करणाऱ्या तिघांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. तरसेमसिंग सुच्चासिंग सहोता यांच्या परिचयातील एका महिलेची काही जणांनी बदनामी केली होती. त्यासंदर्भात त्यांनी शिवम वेदप्रकाश तिवारी, राहुल उर्द कंडी रामसहाय यादव आणि आशीषकुमार उर्फ लल्ला रामचंद्र निषाद यांना फोनवर जाब विचारला होता. त्यांनी त्यांना चर्चेसाठी बोलावून घेतले व तेथे त्यांच्यावर प्राणघातक शस्त्राने हल्ला केला. त्यात त्याचा मृत्यू झाला. तर तर त्यांच्यासोबत असलेल्या दोघांवरही प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. वर्तकनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत, ६ नोव्हेंबर, २०१७ रोजी रात्री ११ वाजता ही घटना घडली होती. या प्रकरणाची अंतिम सुनावणी अतिरिक्त सत्र न्यायलयाच्या न्यायमूर्ती व्ही. एल. भोसले यांच्या न्यायालयात सुरू होती. या प्रकरणात बचाव पक्षाच्या वकिलांच्या युक्तिवादानंतर सरकारी पक्षाच्या वकील वर्षा चंदने यांनी युक्तीवाद केला. घटनेनंतर आरोपींनी गुन्ह्याच्या वेळी परिधान केलेले ती शटर्स काढून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप होता.

या प्रकरणात सरकारी वकील वर्षा चंदने यांनी युक्तिवाद करत न्यायालयात साक्षीदार संतोष सुरेश पांडे याच्या साक्षीसह घटनास्थळाचे परिस्थितीजन्य पुरावे न्यायालयात सादर केले.

मुंबई-नाशिक महामार्गावरील दरोड्यातील १२ जणांना अटक

■ **शहापूर** : मुंबई-नाशिक महामार्गावर शहापूर तालुक्यातील आटगाव येथे रोख रक्कम घेऊन मुंबईकडे निघालेल्या गाडीला थांबवून लुटण्यात आले होते. ही घटना शुक्रवार, १५ मार्च रोजी घडली होती. तब्बल ७ दिवसांनंतर ८ व्या दिवशी या गुन्ह्यातील १२ जणांना अटक करण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला यश आले आहे. त्यांच्याकडून लुटीतील ५० टक्के रक्कम जप्त करण्यात आली आहे. जळगाव जिल्ह्यातील स्कायकिंग कुरिअरच्या ऑफिसमधून कैलास लोहार व सचिन सोडे यांच्या रोख रकमेने भरलेल्या २ गोणी घेऊन कुरिअर कंपनीची पिकअप व्हॅन मुंबईकडे निघाली होती. मध्यरात्री अडीचच्या सुमारास नाशिक येथे स्कायकिंग कुरिअरच्या ऑफिसमध्ये आल्यानंतर रोकड असलेल्या गोण्या दुसऱ्या पिकअप व्हॅनमध्ये भरून कुरिअर कंपनीचे कर्मचारी मुंबईच्या दिशेने निघाले होते. पहाटे साडेपाच वाजताच्या सुमारास मुंबई-नाशिक महामार्गावरील शहापूर तालुक्यातील आटगावच्या हद्दीत पिकअपला एक इनोव्हा कार आडवी घालून कारमधील काहीजण खाली उतरले. हातात प्लास्टिकची पोलीस काठी असलेल्या एकाने आम्ही पोलीस डिपार्टमेंटची माणसे आहोत, गाडीमध्ये काय आहे? आम्हाला गाडी चेक करायची आहे. असे पोलीस असल्याचे भासवून गाडीमधील ५ कोटी ४० लाख रुपयांची रोकड असलेल्या २ गोण्या घेऊन पोबारा केला. याप्रकरणी शहापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला होता. त्यानंतर तब्बल शुक्रवारी ८ व्या दिवशी स्थानिक गुन्हे शाखेचे सुरेश मनोरे यांच्या पथकाने १२ दरोडेखोरांच्या मुसक्या आवळल्या आहेत. या गुन्ह्यात आणखी काही आरोपी असण्याची शक्यता असल्याचा संशय वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, त्या दिशेने शोध सुरू आहे.

साखर गाठींच्या हारांनी सजली शहापूरची मुख्य बाजारपेठ

■ **शहापूर**: होळी आणि गुढी पाडव्याच्या सणाची उत्सुकता सर्वत्र निर्माण झाली आहे. या दोन्ही मोठया सणांच्या पार्श्वभूमीवर साखर गाठींच्या हारांनी शहापूर बाजारपेठ सजली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा साखर गाठीचे दर दहा टक्क्यांनी वाढले असल्याचे येथील प्रशांत वाडेकर या विक्रेत्यांने सांगितले.

रविवारी होळी साजरी झाली. तर पुढील मंगळवारी ९ एप्रिलला गुढीपाडवा सण साजरा होणार आहे. शिमगा आणि होळी सणाचा उत्सव सर्वत्र साजरा होत असल्याने खरेदीदारांची गर्दी बाजारपेठेत पहायला मिळाली. साखर गाठी प्रति नग विकली जात असून, मोठी गाठी १५० तर लहान गाठी ५० रूपये नग या दराने विकली जात आहेत. लहान गाठीचे दर ५० ते १०० रूपये आहेत. त्याचबरोबर रविवारच्या होळीच्या दुसऱ्या दिवशी सोमवारी धुळवड साजरी झाली. बाजारात पाण्याचे रंग उपलब्ध असल्याचे पहायला मिळाले. त्याचे दर ४५ रूपयांपासून पुढे होते. तर इकोफ्रेंडली रंग २० रुपयांपासून पुढे होते.

आमिष दाखवून लाखोंची फसवणूक

■ **मुंब्रा** : महिलेला पार्टटाईम जॉब करून पैसे मिळण्याचे अमिष दाखवून तिची ९ लाख २ हजार पाचशे रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी मुंब्रा पोलिस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ फेब्रुवारी ते ३ मार्च या कालावधीत हा गुन्हा घडला. फिर्यादी महिलेला अनोळखी मोबाईलधारक व्यक्तीने व्हॉटसॲप व टेलिग्राम वर मॅसेज करून पार्टटाईम जॉब करून पैसे मिळण्याचे अमिष दाखविले. त्यानंतर ऑनलाईन टास्क स्किमची लिंक पाठवून वेगवेगळे टास्क पूर्ण करण्यासाठी एकुण ९ लाख २ हजार ५०० रूपये रक्कम विविध यूपीआय आयडीवर ऑनलाईन पाठविण्यास सांगून त्यांची आर्थिक फसवणूक केली आहे.

नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून महिलेला घातला गंडा

■ **मीरा रोड** : काशिमीरा परिसरातील महिलेला शेअर मार्केटमध्ये ऑनलाइन गुंतवणूक करण्यास सांगून १० लाख २९ हजार ३१२ रुपयांची फसवणूक केली होती. ती संपूर्ण रक्कम महिलेला काशिमिरा पोलिसांनी तपास करून परत मिळवून दिली आहे. तक्रारदार प्रियंका दास पूजा यांना शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास अधिक नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक केली होती. या फसवणुकीच्या अनुषंगाने काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत तात्काळ दखल घेऊन तक्रारदाराच्या व्यवहाराची माहिती प्राप्त करण्यात आली. रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यात वळती झाल्याचे दिसून आले. त्या अनुषंगाने तक्रारदारांची रक्कम गोठवण्यासंबंधित बँकेसोबत पत्रव्यवहार करून संशयित खात्यात रक्कम गोठवण्यात आली. नंतर न्यायालयाकडून तक्रारदाराची रक्कम परत मिळण्यासाठी काशिमीरा पोलीस ठाणे अधिकारी, अंमलदारांनी पाठपुरावा केला. तक्रारदाराची फसवणूक झालेली रक्कम १० लाख २९ हजार ३१२ रुपये त्यांच्या खात्यावर परत मिळवून दिली.

सायबर पोलिसांनी दोघांना मिळवून दिली फसवणुकीची रक्कम परत

काशीमिरा पोलीस हद्दीतील प्रकार

■ **मीरा रोड** : मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशीमिरा पोलीस ठाणे हद्दीतील एका व्यक्तीची व एका महिलेची ऑनलाइन फसवणूक करण्यात आली होती. याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी योग्य तपास करून दोघांना फसवणूक झालेली रक्कम परत मिळवून दिली आहे.

तक्रारदार सौरभ यांना त्यांच्या क्रेडिट कार्डाचे व्यवहार सुरू ठेवायचे असल्यास मोबाइलवर पाठवलेल्या लिंकमध्ये कार्डची माहिती भरायला सांगितली. त्यांनी ती माहिती भरून पाठवल्यावर त्यांच्या खात्यातून रक्कम कमी झाल्याचे निदर्शनास आले. तक्रारदाराने आर्थिक फसवणूक झाल्याची तक्रार सायबर पोलीस ठाण्यात केली आहे. याची दखल घेत तक्रारदाराच्या व्यवहाराची माहिती गोळा करण्यात आली. फसवणूक रक्कम नोडल ऑफिसर क्रेडिट कार्ड इंडिसइंड बँकेच्या मर्टंडच्या अकाऊंटवर गेल्याचे दिसून आले. सायबर पोलीस ठाणे यांनी तात्काळ पत्रव्यवहार करून व सातत्यपूर्ण पाठपुरावा करून फसवणूक रक्कम रोखली. थांबविण्यात आली. पाठपुराव्यामुळे फसवणूक झालेली २ लाख १० हजार १६८ रुपये पुन्हा तक्रारदारांना मिळवून देण्यात आले. दुसरी घटनाही काशीमिरा पोलीस ठाणे हद्दीतलीच आहे. तक्रारदार शबाना यांच्या क्रेडिट कार्डचे रिडीम पॉइंट खात्यात जमा करावयाचे असल्याचे सांगितले. नंतर तक्रारदाराच्या मोबाईलवर प्राप्त ओटीपीची माहिती घेऊन आर्थिक फसवणूक केल्याची तक्रार सायबर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. महिलेच्या बँकेतून झालेल्या व्यवहाराची माहिती गोळा करण्यात आली. फसवणूक झालेली रक्कम पायु पेमेंट्स हौसिंग च्या अकाऊंटवर गेल्याचे आढळले. पोलिसांनी तपास करून फसवणूक झालेली रक्कम १ लाख १ हजार ४९६ रुपये पुन्हा मिळवून दिली आहे.

पनवेल पोलिसांची 'ऑल आऊट ऑपरेशन' मोहीम

बेकायदेशीर व्यवसायांवर कारवाई

■ **पनवेल** : पनवेल तालुका पोलिसांनी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपल्या कार्यक्षेत्रात 'ऑल आऊट ऑपरेशन' मोहीम सुरू केली आहे. परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त विवेक पानसरे, सहाय्यक पोलीस आयुक्त (पनवेल विभाग) अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील व पोलीस निरीक्षक (गुन्हे) जगदीश शेलकर यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विविध परिसरात जाऊन ऑल आऊट ऑपरेशन मोहीम राबवली. या वेळी बेकायदेशीर व्यवसायावर कारवाई करण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने अमली पदार्थ विरुद्ध कारवाई करताना दोन आरोपींना अटक करण्यात आली. यातील एका महिलेच्या घरझडती मध्ये ४८ हजार ८४० रुपये किमतीचा २.३९६ किलो गांजा जप्त करण्यात आला. तसेच अमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या इसमांवर कारवाई करण्यात आली आहे. यासोबतच एक गावठी पिस्तुल व ५ जिवंत राऊंड जप्त करून एका आरोपीला अटक केली आहे. तसेच एक धारदार शस्त्र जप्त करण्यात आले. यासोबतच दारूबंदी अधिनियमांनुसार, ११ गुन्हे दाखल करून देशी-विदेशी व हातभट्टी दारू (विनापरवाना विक्री) जप्त करण्यात आली आहे. परिसरातील हिस्ट्रीशिटर, गुंडा चेकिंगदरम्यान तीन जणांना ताब्यात घेतले आहे. पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये २ ठिकाणी नाकाबंदीची कारवाई करण्यात आली होती. या 'ऑल आऊट ऑपरेशन'साठी वपोनि. अनिल पाटील व पोलीस निरीक्षक (गुन्हे) जगदीश शेलकर यांच्यासह ६ सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक, ४४ पोलीस अंमलदारांचा समावेश होता, अशी माहिती पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि. अनिल पाटील यांनी दिली.

गावदेवी मंदिरात पादुकांची चोरी

■ **कल्याण** : पूर्वेतील रेल्वे समांतर रस्त्यालगतच्या कचोरे गावातील गावदेवी मंदिरात पुन्हा एकदा चोरीची घटना घडली आहे. दोन चोरट्यांनी मंदिरातील चांदीच्या पादुका भरदुपारच्या सुमारास चोरून नेल्या. ही घटना सीसीटिव्हीमध्ये कैद झाली आहे. शुक्रवारी दुपारच्या सुमारास गावदेवी मंदिरात दर्शन घेण्याच्या बहाण्याने एक चोरटा शिरला. त्याने देवीची पूजा करत नमस्कार केला. त्यानंतर काही वेळातच बाहेर उभा असलेला त्याचा दुसरा साथीदारही मंदिरात आला. त्यानेही देवीची पूजा केली.

मग इकडेतिकडे बघत देवीच्या मूर्तीसमोर ठेवलेल्या चांदीच्या पादुका चोरून दोन्ही चोरट्यांनी पळ काढला. सायंकाळी स्थानिक ग्रामस्थ देवीच्या पूजेसाठी मंदिरात गेले असता त्यांना चांदीच्या पादुका जागेवर नसल्याचे आढळून आले. या घटनेची माहिती मिळताच अन्य ग्रामस्थही मंदिरात दाखल झाले.

चौकशीच्या फेऱ्यातील ४१ कंपन्यांची भाजपला २,४७१ कोटींची देणगी

निवडणूक रोखे प्रकरणातील याचिकाकर्त्यांचा दावा

■ **नवी दिल्ली** : सीबीआय, ईडी, प्राप्तिकर विभाग यांच्या चौकशीचा सामना करणाऱ्या ४१ कंपन्यांनी निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून भाजपला २,४७१ कोटी रुपयांच्या देणग्या दिल्या. यापैकी १६९८ कोटी रुपयांच्या देणग्या या कंपन्यांवर धाडी पडल्यानंतर देण्यात आल्या, असा दावा निवडणूक रोखे योजनेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणाऱ्या याचिकाकर्त्यांनी केला आहे. निवडणूक आयोगाने निवडणूक रोख्यांसंदर्भातील नवी आकडेवारी जाहीर केल्यानंतर याचिकाकर्त्यांचे वकील प्रशांत भूषण यांनी पत्रकार परिषदेत बोलताना किमान ३० बोगस कंपन्यांनी १४३ कोटी रुपयांहून अधिकच्या रकमेचे निवडणूकरोखे खरेदी केल्याचे सांगितले. सरकारकडून १७२ महत्त्वाचे करार आणि प्रकल्पांचे कंत्राट मिळवणाऱ्या ३३ उद्योग समूहांनी निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून देणग्या दिल्या आहेत. भाजपला १७५१ कोटी रुपयांच्या देणग्या देण्याच्या मोबदल्यात या कंपन्यांना ३.७ लाख कोटींच्या कामांची कंत्राटे मिळाली, असे सांगताना भूषण यांनी काही उदाहरणे दिली. कल्पतरू समूहावर गतवर्षी ३ ऑगस्ट रोजी प्राप्तिकर विभागाची धाड पडली. या धाडीनंतर तीन महिन्यांत कंपनीने भाजपला ५.५ कोटी रुपयांच्या देणग्या दिल्या. फ्यूचर गेमिंग कंपनीवर गतवर्षी १२ नोव्हेंबर रोजी प्राप्तिकर विभागाने, तर १ डिसेंबर २०२१ रोजी ईडीने धाड टाकली. या धाडीनंतर कंपनीकडून भाजपला ६० कोटी रुपयांच्या देणग्या देण्यात आल्या. अरबिंदो फार्मावर १० नोव्हेंबर २०२२ रोजी ईडीने धाड टाकली. यानंतर कंपनीने भाजपला ५ कोटी रुपयांची देणगी दिली. प्रशांत भूषण यांनी निवडणूक रोखे योजना स्वतंत्र भारतातील सर्वात मोठा घोटाळा असल्याचा आरोप केला. निवडणूक रोख्यांद्वारे चार श्रेणींमध्ये भ्रष्टाचार करण्यात आला. पहिला म्हणजे देणगी द्या-कंत्राट घ्या, दुसरे म्हणजे हप्तावसुली, तिसरे म्हणजे कंत्राट घ्या-लाच द्या आणि बोगस कंपनी ही चौथी श्रेणी आहे. या भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी स्वतंत्र एसआयटी स्थापन करण्याची मागणी याचिकाकर्त्या अंजली भारद्वाज यांनी केली.

भाईंदर-वसई रो रो बोटीत तरुणांची मद्यपार्टी

■ सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल, नागरिकांमध्ये संताप

■ **मीरा रोड** : मीरा-भाईंदर आणि वसई या दोन शहरांचे अंतर कमी करण्यासाठी समुद्रात रो-रो बोट सेवा सुरू करण्यात आली आहे. ही रो-रो बोट सुरू झाल्यापासून वादात सापडली आहे. अगोदर अनौपचारिक उद्घाटन खासदारांनी केले. त्यानंतर शासनाकडूनन उद्घाटन करण्यात आले.त्यातही राजकारण करण्यात आले. बूट सुरू झाल्यानंतर काहीच दिवसांत रो रो जेट्टीला धडकून अपघात झाला होता. नंतर आता पुन्हा रो रो बोटीत काही तरुण दारूची पार्टी करतानाचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यामुळे ही प्रवासी बोट आहे का, दारूचा अड्डा, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

भाईंदर ते वसई या दोन्ही शहरांना जोडण्यासाठी हीरो रो रो बोट सेवा सुरू करण्यात आली आहे. यामुळे या दोन्ही शहराचे अंतर कमी झाले असून नागरिकांना जलद सेवा मिळत आहे. नागरिकांचा वेळ बचत व आर्थिक फायदा होत आहे. हो बोट सुरू झाल्यापासून प्रवाशांची संख्या वाढत आहे. या बोटीत ८ ते १० जण टेबल-खुर्च्या टाकून दारू पार्टी करत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या व्हिडिओत मनोरंजनासाठी गाणी लावलेली दिसत आहे.

बोटीत तरुण पार्टी करत असताना त्यांना बोट व्यवस्थापकाने का थांबवले नाही, कोणाच्या राजकीय दबावाखाली पार्टीची परवानगी दिली, सार्वजनिक बोटीचा वापर करत असलेल्या ठिकाणी दारू पार्टी करणे अयोग्य आहे. त्यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

प्रसाधनगृह, स्नानगृहामध्ये सीसीटीव्ही बसवणार का?

■ **मुंबई** : कर्करोगग्रस्त उद्योगपती व आरोपी नरेश गोयल यांना रुग्णालयात वैयक्तिक मदतनीस ठेवण्यास विरोध करणाऱ्या ईडीची सत्र न्यायालयाच्या विशेष पीएमएलए न्यायालयाने चांगलीच कानउघाडणी केली. न्यायाधीश एम. जी. देशपांडे यांनी ईडीच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करत आरोपी स्ट्रेचरवर असताना ईडी कर्मचाऱ्यांच्या व पोलिसांच्या देखरेखीखाली आहे. हे पुरेसे नाही का? प्रसाधनगृह, स्नानगृहामध्ये सीसीटीव्ही बसवण्याची इच्छा आहे का? असे प्रश्न उपस्थित करत गोयल यांना वैयक्तिक मदतनीस देण्यास परवानगी दिली. बँकेच्या सुमारे ५३८ कोटी रुपयांच्या कथित फसवणुकीशी संबंधित मनी लॉंडरिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने गोयल यांना अटक केली. गोयल यांच्या जेट एअरवेजला ७२८ कोटींचे कर्ज दिले होते. त्या रकमेपैकी ५३८ कोटी ६२ लाख रुपयांचे कर्ज जेट एअरवेजने थकवले. गोयल यांनी मोठ्या प्रमाणावर हेराफेरी करून हा पैसा विदेशात पाठवल्याचा ईडीचा आरोप आहे. कॅनरा बँकेने तक्रार दिल्यानुसार सीबीआयने गुन्हा दाखल केला. त्या गुन्ह्याच्या आधारे ईडीने आर्थिक अफरातफरीचा गुन्हा दाखल केला आणि गोयल यांना १ सप्टेंबर रोजी अटक केली. सध्या रुग्णालयात कर्करोगाचे उपचार सुरू असलेल्या गोयल यांनी वैयक्तिक मदतनीस देण्याची विनंती करणारा अर्ज न्यायालयात दाखल केला. या अर्जावर विशेष न्यायाधीश एम. जी. देशपांडे यांच्या समोर सुनावणी झाली. यावेळी ईडीने अर्जाला जोरदार विरोध केला. ईडी कर्मचाऱ्यांच्या व पोलिसांच्या देखरेखीखाली असल्याने वैयक्तिक मदतनीसाची गरज नसल्याचे सांगताच न्यायालयाने संताप व्यक्त केला. आरोपी अर्जदार स्ट्रेचरवर असताना व ईडी कर्मचाऱ्यांच्या व पोलिसांच्या देखरेखीखाली आहे. हे पुरेसे नाही का? त्यांना मदतनीस देण्यास विरोध करणे योग्य आहे का? मानवतेच्या भूमिकेला विरोध का? प्रसाधनगृह, स्नानगृहामध्ये सीसीटीव्ही बसवण्याची ईडीची इच्छा आहे का? त्यांच्यावर कर्करोगाचे उपचार सुरू असताना विरोध करण्याची गरज आहे का? अशा प्रश्नांचा भडिमार करत न्यायालयाने ईडीचे कान उपटले. ईडीची ही भूमिका राज्यघटनेने व्यक्तीला दिलेल्या हक्काच्या विरोधात आहे. त्यांच्या कुटुंबातील पुरुष व्यक्ती त्यांच्यासोबत हॉस्पिटलमध्ये नाही. त्यांची पत्नीही कर्करोगाने आजारी आहे.